१९९३
सत्यमेव जयते

# सरदार

## नियतकालिक

२०१८-१९



## Journey of Girl

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# सरदार वल्लभभाई पटेल

## कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

# शैक्षणिक वर्ष २०१८ – १९ मधील क्षणचित्रे



विद्यापीठस्तरीय एक दिवशीय कार्यशाळा: जागतिक तापमान वाढीचा वातावरणावर होणारा परिणाम ह्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा.श्री. भागवतभाऊ पाटील (अध्यक्ष, ऐ.प.शि.प्र.मं.)

नॅक पीअर टीमचे चेअरमन प्रो.अरुणोदय सहाय, समन्वयक प्रो.दिनेश सकलानी व सदस्य प्रो.कृष्णमुर्ती त्यागराजन आणि प्राचार्य व प्राध्यापक वृंद वृक्षारोपण करतांना.....





विद्यापीठस्तरीय तिन दिवशीय मैत्री कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने व सहकारी

राष्ट्रीय मतदान व मतदार दिनानिमित्त इ.व्ही.एम. वोटर मशिनचे प्रात्यक्षिक दाखवितांना व मार्गदर्शन करतांना मा. तहसीलदार रावेर, श्रीमती उषाराणी देवगुणे, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वृंद



ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर**

ता.रावेर, जि.जळगाव ४२५५०७ फोन – (०२५८४) २७१५४१

सत्यमेव जयते

# सरदार

## वार्षिक नियतकालिक

**शैक्षणिक वर्ष**

**२०१८–१९**

**अंक १९ वा**

**····* संपादक मंडळ *····**

प्रा. एस.पी.उमरीवाड
प्रा. एस.आर.इंगळे
प्रा. डॉ.पी.आर. गवळी
प्रा. डॉ.रेखा.पी.पाटील
प्रा. डॉ.एस.एन.वैष्णव
प्रा. एच.एम.बाविस्कर
प्रा. व्ही.एन.रामटेके

**प्रकाशक**
प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने

**मुद्रक**
सोनल ऑफसेट ॲन्ड स्टेशनर्स, भुसावळ

या नियतकालिकातील प्रकाशित झालेल्या साहित्यातील मते संबंधीत
लेखकांची / कवींची आहे. संपादक मंडळ आणि संस्था या मताशी सहमत असतीलच असे नाही.
(खाजगी वितरणासाठी)

# विद्यापीठ गीत

मंत्र असो हा एकच हृदयी 'जीवन म्हणजे ज्ञान'

ज्ञानामधूनी मिळो मुक्ती अन मुक्तीमधूनी ज्ञान ।।धृ ।।

कला, ज्ञान, विज्ञान, संस्कृती साधू पुरुषार्थ

साफल्यास्तव सदा 'अंतरी पेटवू ज्ञानज्योत'

मंगल पावन चराचरातून स्त्रवते अक्षय ज्ञान ।।१ ।।

उत्तम विद्या, परम शक्ति ही आमुची ध्येयासक्ती

शील, एकता, चारित्र्यावर सदैव आमुची भक्ती

सत्य शिवाचे मंदिर सुंदर, विद्यापीठ महान ।।२ ।।

समता, ममता, स्वातंत्र्याचे नांदो जगी नाते,

आत्मबलाने होऊ आम्ही आमुचे भाग्यविधाते,

ज्ञानप्रभुची लाभो करुणा आणि पसायदान ।।३ ।।

**कै. प्रा. राजा महाजन**

✻ आमचे प्रेरणास्थान ✻



लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



# श्रद्धांजली



मागील शैक्षणिक वर्षात व आजपर्यंत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, कला, सहकार, आदी विविध क्षेत्रातील दिवंगत झालेल्या थोर व्यक्ती, वीर जवान, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, कवी, गायक, उद्योजक, खेळाडू, कलाकार, कृषीतज्ज्ञ, शेतकरी व कार्यकर्ते, जगभरात नैसर्गिक आपत्ती आणि अपघात इत्यादींमुळे प्राणास मुकलेल्या मानव जातीस, आपल्या संस्थेचे सभासद, हितचिंतक, कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय अशा अनेक ज्या व्यक्ती दिवंगत झाल्या त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन त्यांना आदरपूर्वक, भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

**भावपूर्ण श्रद्धांजली**

**कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती !**

# प्राचार्यांचे मनोगत

**'सरदार'** नियतकालिकाचे एकोणिसावे पुष्प आपल्या समोर सादर करतांना मला मनस्वी खूप आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये २६ व्या वर्षात महाविद्यालयाने पदार्पण केलेले आहे गेल्या एकोणविस वर्षांपासून **'सरदार'** नियतकालिक प्रकाशित करण्याचा उपक्रम नियमित सुरू आहे. एकोणविस वर्षात त्यात कोणताही खंड पडलेला नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचे अहवाल, विद्यार्थ्यांचे लेख, कथा, विनोद, कविता, सुविचार, स्फुटलेख वगैरे.... साहित्य **'सरदार'** नियतकालिकात प्रकाशित करीत असतो. एकोणविस वर्षांपासून **'सरदार'** नियतकालिक जेव्हापासून प्रकाशित करीत आहोत तेव्हापासून विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी आणि संस्थाचालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. त्यामुळेच आम्ही हा उपक्रम नियमित सुरु ठेऊ शकलो आहोत.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयाच्या पुर्नमुल्यांकनासाठी नॅक संस्थेकडे अर्ज सादर करण्या आला. नॅक पुर्नमुल्यांकन समितीने महाविद्यालयात दि. २९ व ३० एप्रिल २०१९ रोजी भेट दिली. महाविद्यालय विद्यार्थीसाठी, समाजासाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांबाबत समितीने समाधान व्यक्त केले. १ मे २०१९ रोजी महाविद्यालयास नॅक पुर्नमुल्यांकनात ''ब'' दर्जा प्राप्त झाला.

रावेर तालुक्यात एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमेस्ट्री) व एम.ए. अर्थशास्त्र हे अभ्यासक्रम अभ्यासण्याची सुविधा नसल्यामुळे येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून हे दोन्ही अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस महाविद्यालयाचा आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा व्यवस्थापन मंडळ महाविद्यालयास पुरवित आहे. येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आवश्यक ते अभ्यासक्रम जसे ऑनलाईन कोर्सेस, कौशल्य विकास अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरु करण्याचा मानस आहे.

महविद्यालयातील प्राध्यापक आपल्या दैनंदिन कार्याबरोबरच संशोधनाचे कार्य करीत आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेत आपले शोध निबंध प्रकाशित करीत आहेत. विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास, स्वंयसिध्दा अभियान, जागतिक तापमान वाढ जाणीव जागृती कार्यशाळा, मैत्री कार्यशाळा, रोजगार कौशल्य विकास कार्यशाळा, राष्ट्रीय सुरक्षा कार्यशाळा, योग दिवस इ. उपक्रम राष्ट्रीय सेवा योजने मार्फत रा.से.यो दिन, महात्मा गांधी जयंती, महिला दिन, इ. तसेच विविध मंडळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन वर्षभरात करण्यात आले. या सोबतच वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा,रंगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, स्पर्धा परीक्षा, संगणकाविषयीची कार्यशाळा, स्नेह संमेलन, स्वच्छता मित्र, इ. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अभ्यासेतर उपक्रमाबरोबरच समाजोपयोगी अनेक उपक्रम उदा. रक्तदान शिबीर, पोलीओ लसीकरण मोहिम, साक्षरता रॅली, महिलांसाठी हळदी कुंकू, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता अभियान अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात महाविद्यालय उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. संस्थाचालकांचे कुशल मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेहनती वृत्ती, आणि विद्यार्थ्यांची अभ्यासू व

जिज्ञासू वृत्ती यामुळेच महाविद्यालयाने राबविलेल्या वर्षभरातील विविध उपक्रमांचे प्रतिबिंब म्हणजे '**सरदार**' नियतकालिक होय. आपल्या सूक्ष्मनिरीक्षणाने याचा आपणास प्रत्यय येईलच. प्रामाणिकपणे काम करीत असतांना काही त्रृटी निश्चित राहू शकतात. त्या त्रुटींचा स्विकार करुन भविष्यात त्या राहणार नाहीत अशी ग्वाही प्राचार्य म्हणून मी देऊ इच्छितो. नियतकालिक दरवर्षी प्रकाशित करण्याकरिता व्यवस्थापनाचे अनमोल असे मार्गदर्शन लाभत असते त्यांचे मी आभार मानतो. संपादक मंडळाची मेहनत, सोनल ऑफसेट ॲन्ड स्टेशनर्स, भुसावळ यांचे अचूक मुद्रण यामुळेच हा अंक आम्ही वेळेत आपल्या हाती देऊ शकलो.

**प्राचार्य**

**डॉ. जे. बी. अंजने**



# संपादकीय......

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ या वर्षाचे प्रतिबिंब **‘सरदार’** नियतकालिकाच्या माध्यमातून आपणासमोर सादर करीत असतांना संपादक मंडळाला अत्यंत आनंद होत आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेला या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण **२६ वर्ष** पूर्ण झालेली आहेत. या पंचवीस वर्षामध्ये प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने व व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून गरुड झेप घेतली आहे. महाविद्यालय ग्रामीण भागामध्ये ज्ञानदानाचे कार्य करीत असले तरी तेथील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद हे इंटरनेटच्या माध्यमातून संपूर्ण जगाशी जोडले गेलेले आहेत. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास विभाग हा विद्यापीठाच्या विविध योजना महाविद्यालयीन स्तरावर राबवित असतो, त्यामुळे त्यांचा शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास होत असतो. राष्ट्रीय सेवा योजना, युवती सभा इ. च्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले जाते. विविध समित्या, मंडळे नेहमी कृतीशिल असतात. महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध योजना व कार्यक्रम यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग हा उल्लेखनीय असतो. महाविद्यालय विद्यार्थ्यांस शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू व समाजव्यवस्थेचा कणा मानते. त्यासाठी व्यक्तिमत्व विकासा राष्ट्रीय सेवा योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इ. उपक्रम सक्षमपणे राबविले जातात. या सर्व उपक्रमांचा अहवाल तथा आरसा म्हणजेच ‘सरदार’ नियतकालिक होय.

पुढील कार्यास शुभेच्छा...!

**संपादक मंडळ**



---

**मुखपृष्ठाविषयी थोडेसे –**

‘‘आयुष्याच्या घरट्या मधुनी, जीवनाचा प्रवास साधते जगते–जागवते, प्रेमाचे धागे जुळविते म्हणुन मी स्त्री म्हणवली जाते...’’

स्त्री चा जन्मापासूनचा प्रवास आणि या प्रवासातील काही महत्वाचे पैलू जसे बालपण, किशोरावस्था, सौभाग्य, कुटूंब या पैलूंनी स्त्री जीवनाचा प्रवास दाखविला आहे.

**– कु. हर्षदा सुनिल पाटील**

# - ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ -

## ✲ पदाधिकारी व संचालक सदस्य ✲


श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)


श्री. युवराज विठ्ठल पाटील
(उपाध्यक्ष)


श्री. श्रीराम नारायण पाटील
(चेअरमन)


श्री. संजय वामन पाटील
(सचिव)


श्री. हरी भिका पाटील
(संचालक)


श्री. सुदेश एकनाथ पाटील
(संचालक)


श्री. प्रविण गंभीर महाजन
(संचालक)


श्री. जगन्नाथ शामू पाटील
(संचालक)


श्री. रामदास नारायण महाजन
(संचालक)


श्री. प्रल्हाद मधुकर पाटील
(संचालक)


श्री. विकास दत्तात्रय महाजन
(संचालक)


श्री. नरेंद्र विठ्ठल पाटील
(संचालक)


श्री.डॉ. सतिष पाटील
(संचालक)


श्री. विजय जगन्नाथ पाटील
(संचालक)


श्री. पी.आर. चौधरी
(संचालक)


श्री. आर.एस. पाटील
(सह सचिव)


प्रा. डॉ. जे. बी. अंजने
(प्राचार्य)

## ❊ महाविद्यालय विकास समिती ❊


श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)


श्री. संजय वामन पाटील
(सदस्य)


श्री. पांडूरंग बाजीराव पाटील
(सदस्य)


श्री. डॉ. गंभीर रामू पाटील
(सदस्य)


श्री. वासुदेव हरी पाटील
(सदस्य)


श्री. प्रविण गंभीर महाजन
(सदस्य)


प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने
(पदसिद्ध सचिव)


डॉ. श्री. के. जी. कोल्हे
IQAC (समन्वयक)


प्रा. एन. यू. बारी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी


प्रा.डॉ. पी.आर. गवळी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी


प्रा.डॉ. एस.एन. वैष्णव
(सदस्य)
(रसायन शास्त्र विभाग प्रमुख)


प्रा.डॉ. नीता एस. वाणी
(सदस्य)
(महिला शिक्षक प्रतिनिधी)


श्री. नितीन पी. महाजन
(सदस्य)
शिक्षकेत्तर प्रतिनिधी

## विशेष अभिनंदन


स्मृतीशेष
प्रा. डॉ.आर.बी.खंडारे
मरणोपरांत पीएच.डी.प्राप्त


प्रा. एन. यू. बारी
क.ब.चौ.उ.म.वि.
स्थायी समिती सदस्य म्हणून
बिनविरोध निवड


प्रा.डॉ. के. जी. कोल्हे
क.ब.चौ.उ.म.वि. अप्लाईड सायन्स
अभ्यास मंडळ सदस्यपदी निवड
तसेच विज्ञान शाखा सदस्य पदी
बिन विरोध निवड

# महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी



कु. पाटील ऋतुजा नरेंद्र
तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र)
प्रथम क्रमांक व विद्यापीठात तृतीय



कु.महाजन श्वेता पांडुरंग
प्रथम वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



कु. चौधरी अंकिता रमेश
द्वितीय वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



पाटील निकिता नितीन
प्रथम वर्ष कला
प्रथम क्रमांक



कु. चौधरी भाग्यश्री अनिल
द्वितीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



कु. चौधरी अश्विनी देवराम
द्वितीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. भोई वैशाली सोमा
द्वितीय वर्ष कला (इतिहास)
प्रथम क्रमांक



कु.पाटील काजल रविंद्र
तृतीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



गजरे पवन सुनिल
तृतीय वर्ष कला (इतिहास)
प्रथम क्रमांक



कु. कोळी दुर्गा अशोक
तृतीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. शिंदे प्रिती हिरामण
एम.ए.(मराठी)
प्रथम क्रमांक



कोळी गजानन संतोष
उत्कृष्ट ग्रंथालय वाचक
प्रथम क्रमांक

## विशेष अभिनंदन



प्रा.डॉ. निता सुधाकर वाणी
क.ब.चौ.उ.म.वि.
बी व्होक तदर्थ अभ्यास
मंडळाच्या सदस्य पदी निवड



प्रा.डॉ. आर.व्ही.भोळे
क.ब.चौ.उ.म.वि.
भुगोल अभ्यास मंडळ
सदस्य पदी निवड

## जिमखाना विभाग (विद्यापीठ खेळाडू)



कु. पाटील प्राजक्ता सतीष
क्रिकेट
आंतर विद्यापीठ खेळाडू



उमेश जवाहर पवार
बेसबॉल
आंतर विद्यापीठ खेळाडू

## महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करतांना प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी

विद्यापीठस्तरीय वनस्पतीशास्त्र (S.Y.B.Sc.) अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळेत मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने





विद्यापीठस्तरीय विभागीय युवक महोत्सव- 'युवारंग' कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे सहभागी टीम.......

स्वयंसिध्दा अभियाना अंतर्गत कराटे शिबिरामध्ये प्रशिक्षण घेतांना विद्यार्थिनी



## महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



नॅक पुर्नमुल्यांकनावेळेस नॅक समिती महाविद्यालयाच्या नॅक सुकाणू समिती सोबत चर्चा करतांना.

विद्यापीठस्तरीय एक दिवशीय कार्यशाळा: विद्यार्थींनी व्यक्तिमत्व विकास  कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जे.बी.अंजने





वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन कौतुक करतांना मा.श्री. श्रीराम नारायण पाटील (चेअरमन, ऐ.प.शि.प्र.मं.)

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरात श्रमदान करतांना रा.से.यो. चे स्वयंसेवक



# महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



स्वयंरोजगार निर्मिती कार्यशाळेत उपस्थित
मा. खासदार श्रीमती रक्षाताई खडसे आणि मान्यवर

विद्यापीठस्तरीय एक दिवशीय कार्यशाळा -
रोजगार कौशल्य विकसन कार्यशाळेत मार्गदर्शन
करतांना रावेर महाविद्यालयाचे प्रा.एस.बी.धनले...






राष्ट्रीय मतदान आणि मतदार जनजागृती कार्यक्रमात
रांगोळी स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरात
पथनाट्य सादर करतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक



# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | लेख/कविता | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठी विभाग | १५ ते ३८ |
| २ | हिंदी विभाग | ३९ ते ४३ |
| ३ | अहवाल विभाग | ४७ ते ४८ |




# मराठी विभाग

माझी माय सरसोती
माले शिकवते बोली
लेक बहिनाच्या, मनी
किती गुपीतं पेरली

*

माझ्यासाठी पांडुरंगा
तुझं गीता भागवत
पावसात सामावतं
माटी मधी उगवतं



**कवयित्री बहिणाबाई चौधरी**

# माझी मायबोली मराठी

उध्दारीली ज्ञानदेवे जगती
मायबोली मराठी भाषा
अमृताची घेऊन ती गोडी,
जगी वाढेल मराठी भाषा,

महाकवी कुसुमाग्रज म्हणजे वि.वा.शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस ‘मायबोली मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने युनेस्कोच्या पुढाकारने जगातील सर्व भाषांना एकाच पातळीवरुन सन्मान देण्यासाठी सन २००० पासून २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा करण्याचा उपक्रम सुरु केला. या दोन्ही सुदिनाचे औचित्य साधून २१ ते २७ फेब्रुवारी हा आठवडा मायबोली मराठी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. हे दोन्ही दिवस आपल्या मायबोलीच्या सम्मानाचे आहेत.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. किंबहुना, तंत्रज्ञानाच्या युगात वेगवेगळ्या भाषांसोबत आता मराठी भाषेचा वापर इंटरनेट चा उपयोग करणाऱ्यांकडून होतो आहे, ही मराठी भाषक म्हणून आपल्यासाठी नक्कीच अभिमानाची बाब होय. महाराष्ट्रातील मराठी भाषा आणि इथल्या संताची परंपरा हेच शिरवाडकरांच्या श्रध्देचे विषय होते.

‘माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
तिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोल्यातील शिला’

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या अवघ्या चार ओळीतून मराठी भाषेचा स्वाभिमान उगवत्या सूर्याप्रमाणे प्रकट झाला आहे. मातृभाषेतून अध्ययन व्हावे हा कुसुमाग्रज यांचा आग्रह होता. ते अनेकदा म्हणायचे समाजाची प्रगती क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते. आज मराठी भाषा व शिक्षणातील मराठी माध्यम याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मातृभाषेला दपूक्षर लोटून इंग्रजीची आराधना करणे हे भविष्यातील अनेक समस्यांना निमंत्रण देण्यासारखे आहे. मातृभाषेतून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यामुळे मुलांना कुटूंब, समाज यांच्याविषयी आस्था, वाचनाची गोडी, कविता आणि सामाजिक समरसता निर्माण होते. पण गेल्या दशकापासून इंग्रजी माध्यमातील शिक्षण पाल्याला देण्यावर पालकांचा भर आहे. काही पालकांना वाटते की मराठी किंवा मातृभाषेत शिक्षण घेतल्यामुळे उच्च शिक्षणात इंग्रजी माध्यम नसल्याने समस्या निर्माण होईल, पण पालकांच्या आग्रहामुळे मुलाला नीट इंग्रजीही येत नाही. पूर्णपणे आपली मातृभाषाही बोलता येत नाही. इंग्रजी भाषेला वगळून आपल्या मराठी मायबोली भाषेला शिक्षणात आणणे खूप गरजेचे आहे.

शिक्षण शास्त्रज्ञ देखील मान्य करतात की, शिक्षण मातृभाषेतून दिले जावे. आजच्या घडीला शिक्षणाच्या विकासाचा जो डोंगर निर्माण झाला आहे. त्याला जागोजागी भाषेने आधार दिला आहे. आपल्या आजूबाजूला उच्च शिक्षण घेतलेले संशोधक, डॉक्टर, अभियंता झालेले पाहिले तर त्यांनी मातृभाषेत शिक्षण घेऊन प्रगती केली आहे.

मुलांच्या कर्तृत्वाला उजाळा देण्याचे काम मातृभाषा करते. त्यामुळे मुलांना मातृ भाषेवर व बोली भाषेवर प्रेम करायला शिकवा. हेच वारंवार कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून पटवून देण्याचा अट्टाहास केला आहे.

'गगनापरी जगावे
मेघापरी मरावे
तीरावरी नदीच्या
गवतातूनी उरावे '

असं जीवनाचं उद्दीष्ट सांगणाऱ्या कवीने आपल्याला भाषेचा व सुरेल जगण्याचा जो मंत्र दिला, तो जपण्यासाठीच २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन, साजरा करतो. तेव्हा मराठी भाषेला वैभवाचे दिवस प्राप्त होवोत, हीच सदिच्छा.....!

म माझा शब्द
रा माझे विचार
ठी माझा श्वास
माझी स्फुर्ती
माझ्या रक्तात मराठी

**पाटील भाग्यश्री धनंजय**
द्वितीय वर्ष बी.एस्सी./

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची वास्तव परिस्थिती

मानवाला जीवन जगण्यासाठी जसे अन्न, वस्त्र आणि निवारा यांची गरज आहे त्याप्रमाणे बदलल्या काळानुसार शिक्षणाचीही तेवढीच गरज आहे. पण प्रत्येकाला हे शिक्षण घेता येतेच का ? प्रत्येकाला वाटते आपण शिकले पाहिजे पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची परिस्थिती वेगळी आहे. त्यांना बऱ्याच सोयी सवलती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. शहरातील परिस्थिती वेगळी आहे. तिथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांना शिक्षण घेण्यात अडचण येत नाही. ग्रामीण भागातील खेड्या पाड्यात साधा क्लास चालवायचा असल्यास ती सोय नसते त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. त्यात बसेसचा प्रॉब्लेम असतोच. आजही जगाचा विचार केल्यास जग खूप पुढे गेलेलं आहे. नवनवीन सोयी सुविधा, तंत्रज्ञान विकसित झालेलं आहे पण त्यामानाने ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही. असा नाही की खेड्या पाड्यातील गावाकडची मुल हुशाल नसतात उलट शहराच्या मुलांची आणि गावाकडच्या मुलांची तुलना केल्यास गावकडची मुलेही खुप हुशार असतात पण त्यांना योग्य मार्गदर्शन सोयी सुविधा उपलब्ध नसतात त्यामुळे ते मागे पडतात.

आज एकीकडे शिक्षणाचे एवढे महत्व आहे आणि दुसरीकडे ग्रामिण भागातील मुलींना शिकावे असे वाटत असले तरी मन मारुन घरीच बसावे लागते. १० वी १२ वी पर्यंत शिक्षण करुन घरीच बसावे लागते. योग्य मार्गदर्शन पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्याच्यांत शिकण्याची जिद्द असुनही शिकता येत नाही. आणि ग्रामिण भागातील लोकांचे विचार शिक्षणाच्या बाबतीत फारसे बदललेले नाहीत. त्यांना वाटते मुलगी शिकून काय करणार आहे, सासरीच जायचे आहे. कुणी एकटीला घरा बाहेर पाठवत नाही. अश्या असंख्य अडचणी आहेत. आजही जर आपण पाहिले तर गावात दोन.चार मुली सोडल्या तर कोणी शिकत नाही. कारण घरच्यांचे सहकार्य मिळत नाही. त्यात जाण्या येण्याचा प्रोब्लेम, त्यामुळे शिक्षणापासून वंचित रहावं लागत आणि त्यातच कोणाची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असेल तर ते या सर्व अडचणीवर मात करत शिक्षण घेत आहे.

आपण १५ ऑगस्ट २६ जानेवारी ला घोषणा देतो.
।। शिकलेली आई घर पुढे नई ।।

पण या सगळ्याचा विचार केल्यास ग्रामीण भागातील आई ही शिकलेली आहे का? प्रत्यक्ष पहिल्यास असे वाटते की ग्रामीण भागात खूप सुधारणा झाल्या आहेत पण प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे.

मुलींची अवस्था तर फारच दयनीय आहे. त्यांच्या मनात कितीही असलं की शिकायचं आहे. काही तरी करुन दाखवायचे आहे पण सोयी सुविधांच्या अभावामुळे घरीच बसाव लागत. गावापर्यंत बस उपलब्ध नसते. बस स्टँडपर्यंत पायी जावं लागतं. पण अश्याही परिस्थितीत विद्यार्थी या परिस्थीतीवर मात करीत शिक्षण घेत आहेत.

तालुक्याला ग्रॅज्युएशन पर्यतं शिक्षक आहे आणि त्यानंतर शिक्षण घ्यायचे असल्यास जळगाव, भुसावळ सारख्या शहरा शिवाय पर्याय नाही. मी सुध्दा एक विद्यार्थीनी या नात्याने या वास्तव परिस्थीती मांडत आहे. कारण मी सुध्दा या परिस्थितीतुन जात आहे. मी ऐनपूर कॉलजला ॲडमिशन घेतलेली आहे. कोणीही सोबत नाही. त्यात बसचा मार्गच उपलब्ध नाही. त्यामूळे कोणाचा तरी भाऊ किंवा वडिलांना माझ्या सोबत यावे लागते. कारण शिक्षण घ्यायचंच. अश्या अडचणीवर मात करीत जो तो आपले शिक्षण पूर्ण करतो .

आज आपण पाहतो की शिक्षणाला एवढे महत्व आहे. प्रत्येकाला वाटते आपल्याला नोकरी लागली पाहिजे त्यामुळे जर दहा हजार जागा निघाल्या तर १ लाख लोक येतात. का तर प्रत्येकाला वाटते आपण नोकरी केली पाहिजे. पण आज ग्रामीण भागातील मुलींची परिस्थिती वाईट आहे.

ग्रामीण भागात बऱ्याच गावामध्ये १० वी पर्यंत पण शाळा नाही. तेव्हा पासून त्यांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो आहे. आणि आजही तीच परिस्थिती आहे. भारत स्वातंत्र होवुन ७२ वर्ष उलटुन गेली तरीसुध्दा ज्या ग्रामिण भागातील मुली आहेत त्यांचा शिक्षणाचा जो प्रश्न आजही प्रलंबित आहे त्याकडे एकाही राजकीय, किंवा सामाजिक नेत्याच लक्ष नाही असंच म्हणाव लागेल. कुठेतरी ही परिस्थिती बदलली गेली पाहिजे व ग्रामीण भागातील मुलींची प्रश्नांना वाचा फोडली गेली पाहिजे एवढीच विनंती मी या माझा लेखामधून करु इच्छीते.

मुलींना शिक्षण घेता यावे यासाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहे. जसे

।। बेटी बचाओ बेटी पढाओ ।।

पण प्रत्यक्षात ग्रामीण भागातील मुलींना शिकायला मिळतंय का ? पुरेश्या सुविधा उपलब्ध नाही. आणि आज समाजात घडणाऱ्या चित्र विचित्र घटनांमुळे आई वडिलांना नाही वाटत की आपली मुलगी घराबाहेर पडली पाहिजे आणि ग्रामीण भागात या सर्व गोष्टीनां प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलींना त्यांना हवे तेवढे शिक्षण घेता येत नाही. चूल आणि मूल यातून बाहेर पडून स्त्रियांनी शिकले पाहिजे, स्वावलंबी बनले पाहिजे पण त्यासाठी आधी शिक्षण घेणे गरजेचे आहे. पण ग्रामीण भागातील मुलीनीही या सर्व अडचणीवर मात करीत शिक्षण घेतले पाहिजे. चूल आणि मूल या कचाट्यातून बाहेर पडून स्वावलंबी बनले पाहिजे.

**चौधरी निकिता प्रभाकर**
एम.ए.मराठी द्वितीय वर्ष

---

# व्यवनाधीनता समाजाला लागलेली कीड

**व्यसन** म्हणजे काय...? तर एखादी अशी सवय की ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर शारिरीक, मानसिक व सामाजिक त्रास होत असल्याची जाणीव होत असूनही त्यात बदल करणे शक्य होत नाही.

आजकाल व्यसनांचे दुषपरिणाम विविध व्यावहारिक कारणांसाठी, विशेषत: चिंतामुक्त होण्यासाठी किंवा मौजमजा करण्यासाठी मनुष्य निरनिराळ्या व्यसनांचा आधार घेतो.

मनुष्य व्यसन का करतो....? तर आपण अध्यात्मिक दृष्टीकोणातून पाहिल्यास काही अध्यात्मिक कारणांमुळे जिवनात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मनुष्य व्यसनाच्या आहारी जातो. दैनंदिन जीवनात उदभवणाऱ्या समस्या, परिक्षेच्या वेळी आजारी पडणे, प्रामाणिकपणे अभ्यास करुनही अपेक्षित यश न मिळणे यामुळे अनेक प्रकारची व्यसने लागतात. सिगारेट ओढणे, दारु पिणे, मादक पदार्थांचे सेवन करणे, तंबाखू खाणे इ. मुळे दात, घसा, हृदय, जठर तसेच श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे विकार होऊन कर्करोग व भयंकर रोग निर्माण होतात.

व्यसनांमुळे आपल्यावर मानसिक दृष्परिणामही होतात. मन व बुद्धी अकार्यक्षम बनून मानसिक त्रास होतो. तसेच व्यसनांची पूर्तता करण्यासाठी बरेच पैसे खर्च होतात. म्हणून व्यसन म्हणजे 'विकतचे दुखणे होय'

व्यसनाची हो वाट । जिवनास नाट
होते बरबादी । आयुष्याची ।।
तंबाखूचा विडा । सडवी जबडा
कॅन्सरला आमंत्रण । देई जे ।।
दारुची ती नशा । मोह हवा कसा
पडती आतड्यास भोके । आपल्याची ।।
पुडी ती गुटख्याची । दात तोंड रंगवी
समोरचा न थांबे । आपुल्यापाशी ।।
नका पिऊ दारु । जिवन सुधारु
उधळू आनंदी आनंद । चौफेर ।।
तंबाखूला चुना । नका लावू आता
राखू मुख आरोग्य । अबाधित ।।
सोडुनी धुम्रपान । अबादित ।।
सोडुनी धुम्रपान । काढुनि घाण
जगुया जिवन आनंदाने ।।

मोबाईलच्या हो एक रोग पडतात.
नंतर करु म्हणून अभ्यास टाळतात.
उपभोग योग्य इंटरनेटचा कळेना
आजकाल मुलं का हो असे वागतात.
वाईट गोष्टी ते आधी पत्कारतात.
भल्या-बुऱ्याची ओळख न करता.
आपल्याच मनाला श्रेष्ठ समजतात

मित्र हो, ज्या लोकांना जीवनाचा अर्थ कळत नाही. तेच लोक व्यसनाच्या आहारी जातात. खरंच जीवन खूप सुंदर आहे. परंतु ते जगण्याची दृष्टी आपल्यात असावी लागते.

वाईट व्यसनाधीन होऊन आपल्या
जीवनाची राखरांगोळी करुन नका.

धन्यवाद ..........

## माणसं

जीवनाच्या वाटेवर
साथ देतात, मात करतात,
हात देतात, घात करतात.
ती ही असतात.............. माणसं !

संधी देतात, संधी साधतात.
आदर करतात, भाव खातात.
ती ही असतात......माणसं !

वेड लावतात, वेडे ही करतात,
घास भरवतात, घास हिरावतात
ती ही असतात....माणसं

शब्द पाळतात, शब्द फिरवतात
गळ्यात पडतात, गळा कापतात
ती ही असतात.... माणसं !

दूर राहतात, तरी जवळचीच वाटतात
जवळ राहून देखील, परक्यासारखी वागतात
ती ही असतात..... माणसं !

नाना प्रकारची अशी नाना माणसं,
ओळखायची कशी
सारी असतात आपलीच माणसं !

**पाटील रितेश सुरेश**
प्रथम वर्ष कला

## काय कराल ? काय व्हाल ?

| | | |
|---|---|---|
| अभ्यास करा | – | गुणवान व्हाल |
| ध्यान करा | – | ज्ञान मिळेल |
| प्रार्थना करा | – | प्रगती मिळेल |
| भक्ती करा | – | मुक्ती मिळेल |
| दान करा | – | धर्म वाढेल |
| सत्य बोला | – | साथ मिळेल |
| असत्य बोलाल | – | लाथ मिळेल |
| लाच घ्याल | – | आत जाल |
| आत्मविश्वास वाढवा | – | यशस्वी व्हाल |
| कला शिका | – | अमर व्हाल |
| कष्ट करा | – | सुख मिळेल |
| समाधानी रहा | – | सुख मिळेल |
| व्यसन सोडा | – | शांती मिळेल |
| आई वडिलांची सेवा करा | – | महान व्हाल |

विसरा सर्वांना...... पण आईवडीलांना विसरु नका
पाषाण पूजलेत त्यांनी अनेक...
अरे तुमच्या जन्मासाठी
पाषाण बनून आईवडीलांचे हृदय कधी तुडवू नका.
आईच्या त्या प्रेमळ नेत्रामध्ये चुकूनही अश्रू आणू नका.
लाखो रुपये कमवीत असाल, पण
पण आई वडिलांपेक्षा पैसा, जास्त नाही.

# 'मराठी भाषा आमुची मायबोली'

'मराठी भाषा आमची मायबोली' म्हणजे मातृभाषा. लहान मूल जन्मल्यापासून आईजवळच असते. तेव्हा ती ज्या भाषेत बोलते ती मुलाची भाषा होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषा प्रत्येक प्रांताची निराळी. ती तेथील लोकांची होते आणि ती आवडते. आपली मराठी भाषा संस्कृत भाषेतून आली. तशा भारतातल्या बहुतेक सर्व भाषा संस्कृत भाषेपासुन निर्माण झाल्या. आपली मराठी भाषा सर्व महाराष्ट्राची जरी एक असली तरी तीच दर बारा कोसावर बदलते. लेखी भाषा तीच असली तरी बोली भाषेत फरक होतात. तिचे हेल वेगळे होतात. मराठी भाषेत सुध्दा असे प्रकार होतात. कोकणातली कोकणी, घाटावरती म्हणजे देशावर ची वेगळी घाटी भाषा वेगळी, वऱ्हाडी भाषा वेगळी मध्यप्रांतातील मध्यप्रदेशातही हिंदी मिश्रीत आणि गोव्याकडील कोकणी वेगळी असते.

मराठी भाषा लवचिक आहे थोड्या थोड्या फरकाने शब्दाचे अर्थ बदलतात. मुंबईची मराठी भाषा हल्ली खिचडी भाषा झाली आहे. शुध्द मराठी राहिली नाही. तिच्यात हिंदी, मराठी, इंग्रजी यांची भेसळ झाली आहे. हिंदी आणि इंग्रजी सिनेमा पाहून भाषा अशी झाली आहे. पुर्वी मराठीला राज भाषेचा मान नव्हता. पण आता आहे.

खेड्यापाड्यातही रांगडी आणि अशुध्द अपभ्रंश असलेली भाषा असते. कशीही असो ती मराठी म्हणून मराठी माणसाला आवडते.

आपल्या भाषेचा आपल्याला अभिमान असतो. पण अलिकडे आपल्या तरुण मंडळीला इंग्रजी भाषेचे जास्त आकर्षण ! त्यात त्यांचा दोष नाही. कारण त्यांचं महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण सर्व इंग्रजीतून होत असतं. पदव्या मिळवून तरुण मंडळी परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. तिथे इंग्रजी भाषाच बोलावी, लिहावी लागते. साहजिकच त्या भाषेचे संस्कार घडत असतात. त्या विकसित देशात आपल्या लोकांना द्रव्यप्राप्ती भारतातील लोकांपेक्षा जास्त प्रमाणात होते. त्यामुळे त्यांना तिकडेच रहाणे सुखाचे होते. त्यांचे संसार तिथेच होतात. त्यांच्या मुलांना मराठी येत नाही ती तिथलीच होतात. सर्वजण नाही पण काही तिथेच स्थायी होतात. त्यामुळे त्या मुलांची मायबोली तिकडची होते. हा विषय जरा वेगळा असला तरी मराठी भाषेवर, राहणीवर, आचार विचारांवर खूपच फरक होतो. त्यांच शिक्षणही तिकडेच होते. त्यामुळे त्यांना ग्रंथ, माहितीवार्ता नाही. संस्कारही तिथलेच, असे तिकडे राहिल्यामुळे होते. पण भारतात राहणाऱ्या तरुणांना आपल्या भाषेचा अभिमान नाही आणि त्यांना स्वत:च कौतुकही वाटते तेव्हा तुम्ही शिकुन मोठे व्हा. उच्च शिक्षणासाठी परदेशात गेलत तरी हरकत नाही, पण काम झाल्यावर परत आपल्या भारतात या.

महाराष्ट्राला आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा करु द्या. परभाषा जरी अवगत झाली आणि परदेशात गेलात तरी मराठीला विसरु नका. प्रत्येक मराठी माणसाला मराठी भाषा बोलता लिहीता–वाचता आली पाहिजे. आपल्या मराठीत सुध्दा खूप विषयावर लेखन झाले आहे. शास्त्र–विज्ञान, ललित साहित्य खूप आहे. परदेशातून स्वदेशात येण्यासाठी सागरा प्राण तळमलला म्हणणारे स्वातंत्र्सुर्य सावरकरांची आठवण ठेवा.

२७ फेब्रुवारी १९५२ ! हा ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक नाटककार कवी, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री. वि.वा.शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिवस अभिमानाचा वाटतो. कारण हा दिवस समस्त मराठी जनतेला अभिमानाचा वाटतो. कारण हा 'जागतिक मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो.

''आजी सोनियाचा दिनु । वर्षे अमृताचा धनु ।'' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. त्यांच्या या अमृतमयी शब्दांची बरसात मनाला सुखावून जाते कारण मराठीच्या म या अक्षरात 'मी' माझी मराठी; 'मायबोली' अशा सर्व म कारांत मी, माझे महान, मानसन्मान असे सर्व सामावलेले आहेत. म्हणून आम्ही म्हणतो, मराठी असे आमुची

मायबोली. इतर भाषा या तिच्या भगिनी आहेत. त्याच्याशी आपले नाते, मावशीचे म्हणजे त्यात ही परत 'म' चाच आरंभ ! मग या भाषा मावशीशीही आपले नाते आहे, ते गोडच असणार व गोडच असले पाहिजे.

जो मराठी द्वेष्टा नाही, जो मराठीचा राग–द्वेष ,दुश्वास करत नाही. तर उलट ज्यांच्या रोमा–रोमात मराठीची आपुलकी जिव्हाळा, प्रेम असेल असे सर्वजण मराठीच होत. अशा व्यक्तीकडून मराठीचा अपमान कधीच होणार नाही तर उलट मराठीच्या उन्नतीला व प्रसाराला त्यांचा हातभारच लागेल. अशा या मराठीचे कौतुक काय सांगावे ! मराठीचा उच्चार, व्यंजन, स्वर यांत गल्लत तर नाही. (असलतीच तर ती अत्यल्प). मराठी भाषा ही अत्यंत तरल, सुक्ष्म व संवेदनशील आहे. अशा या संपन्न,परीपुर्ण भाषेचा जगातील ८००० भाषांमध्ये १५ वा क्रमांक लागतो. अशी ही मराठी असेच असेल. सातसमुद्रापलिकडे असलेली पाश्चात्य् भाषा आपण शिकतो कारण त्याचे विस्तारीत क्षेत्र व सहज साध्य असा अर्थार्जनाचा हेतू असू शकतो. परंतु पाश्चात्य् भाषा आपल्याला शिकावी लागते तर मायबोली आपल्या रक्तात, तनामनात असते ज्यामुळे आपल्या संस्कारांचे पालनपोषण होते आणि आपल्या अस्तीत्याची प्रत्यक्ष व्यवहारात वापरने, मराठीविषयी सुलभ ज्ञान देणे, मराठी भाषेला वैश्विक स्वरुप देणे. समाजाला तिची उपयोगिता पटवून देणे. तसेच विविध मराठी साहित्य प्रकार लोकांपर्यंत पोहोचवणे अशा अनेक गोष्टींनी भाषा टिकून राहते. इतकेच नाही तर तिची प्रगती होते. त्याासठी आपण मात्र प्रयत्नशील असावे. या प्रयत्नासाठी आपण वचनबध्द असले पाहिजे व जागतिक मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने आपण याचा आढावा घेतला पाहिजे व स्वत:च एक मराठी म्हणुन तपासुन पाहीजे की आपण या वर्षी किती प्रगती केली ? घटनेने आपल्याला जो अधिकार दिला आहे. त्याचा मान राखून किती वर्चस्व प्रस्थापित केले यांचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. परंतु एक गोष्ट निश्चित जोपर्यंत आपल्याला आपल्या जन्मभूमी, कर्मभूमीची मनापासून ओढ प्रेम वाटत नाही तो पर्यंत सर्व व्यर्थ आहे. जेव्हा आपल्याला कोणी विचारले की, येते ! असे आले तर मग तो आपल्याच अस्तित्वाचा अपमान असेल. मग अशावेळी अशा व्यक्तीकडून भाषेचा मान व तिचे आस्तित्व कसे राखले जाणार.

म्हणुनच आपल्याला आपली ओळख व अस्तीत्व हि ठेवायचे असेल तर भाषा टिकवणे जपणे गरजेचे आहे.

मराठी माणसाला स्वराज्य उभं करता येतं.
मराठी माणसाला भारतीय राज्य घटना लिहीता येते.
मराठी माणसाला भारतीय चित्रपट सृष्टीची मुहूर्तमेढ रोवता येते
मराठी माणसाला पार्श्वगायनात सम्राज्ञी बनता येतं.
मराठी माणसाला क्रिकेटचा शहेनशहा होता येतं.
मराठी माणसाला संपुर्ण भारतात पहिली मुलीची शाळा काढता येते.
मराठी माणसाला पहिली महिला शिक्षिका बनता येतं.
मराठी माणसाला पहिली राष्ट्रपती बनता येतं.
मराठी माणसाला पहिली इंडियन आयडॉल बनता येते.
मराठी माणसाला पहिली कोरडपती बनता येते.
मराठी माणसाला पहिली नच बलिये विन बनता येते
मराठी माणसाला महासंगणक बनविता येतो.
मराठी माणसाला पहिली महिला डॉक्टर बनता येते
लाभले अम्हांस भाग्य बोलतो मराठी

पाटील भाग्यश्री धनंजय
द्वितीय वर्ष विज्ञान

## दोन शब्द जगण्याविषयी

कुणाला आपला कंटाळा येईल इतक जवळ जाऊ नये
चांगुलपणाच्या ओझे वाटेल इतके चांगले वागू नये
कुणाला गरज नसेल आपली तिथे रेंगाळून राहू नये.
नशिबाने जुळलेली नाते जपावी पण स्वत:हून तोडू नये.
जवळपणाचे बंधन होईल इतके जवळचे होऊच नये
नकोसे होऊ आपण इतके आयुष्य जगूच नये,
हवे हवेसे असतो तेव्हाच पटकन
दूर निघून जावे, आपले नाव
दुसऱ्याच्या ओठी राहिल इतकेच करुन जावे.
कारण
जीवनाच्या वाटेवर साथ देतात, मात करतात, हाते देतात,
घात करतात, ती ही असतातं......माणसं !
पाठीशी असतात, पाठ फिरवतात,
वाट दाखवतात, वाट लावतात
नाना प्रकारची अशी नाना माणसं,
ओळखायची कशी सारि असतात आपलीच माणसे !



## छोट्याशा आयुष्यात

छोट्याशा आयुष्यात
खूप काही हवं असत....
हातातून सुटणाऱ्या गोष्टीच्या पाठीच
वेड मन हे धावत राहत............

छोट्याशा आयुष्यात
प्रश्न खूप पडतात ?
मनापासून प्रयत्न केली की
ते नक्कीच सुटतात.

छोट्याशा आयुष्यात
मृगजळे खूप दिसतात
डोळ्याची पापणी उघडताच
खूप दूर ती निघून जातात.

छोट्याशा आयुष्यात
जबाबदारीचे ओझे खूप मोठे असतं
न समजुन घेणाऱ्यांना
ते कधीच दिसत नसतं.........

छोट्याशा आयुष्यात
अपेक्षा खूप असतात
पण त्या सगळ्याचं कधीही
पूर्ण होत नसतात......

**मयुर दिलीप पाटील**
प्रथम वर्ष कला

# ‘खंत’

ऋतुपालटावर नजर ठेवून
सोडून चालली आहेत एकाकी
खंत याची नाही :
तसा........... जिवघेण्या विषन्नतेत
मरण कागदावर लिहित
मी जगतच होतो पण............
तू जगणंच घेऊन चालली आहस जाता जाता............
आणि आता माझ्या शब्दांना
कसलाच आशय नाही.
मागण्यासारखं काही
तुझ्याकडे मी मागितलंही असतं.
पण खंत मला माझीच आहे
मला गर्भाशाय नाही.

स्पष्टीकरण :– ‘खंत’ ही कविता प्रेमभंग पावलेल्या प्रियकराच्या मनातील एक खंत व्यक्त करणारी आहे.

प्रेयसी सोड्न गेल्याची एकाकी कवितेतील प्रियकर म्हणत असला तरी जिवघेण्या विषन्नतेत, मरण कागदावर लिहित, मी जगतच होतो, या ओळीतून लक्षात येते की प्रेयसीच्या निघून जाण्याने त्याच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे; त्याच्या शब्दांना आता कसलाच आशय उरलेला नाही. त्याची विकल अवस्था झालेली आहे. निघून जाण्यापूर्वी वाटते. प्रेमाच्या नात्याची काहीतरी आठवण तरी आपल्या ती काय असू शकते ? तर दोघांच्या एकत्र येण्यातून निर्माण घेणारा नवीन जीव प्रेमाच्या नात्याची अर्थपूर्ण खूण असते. तशी काही खूण आपल्याकडे राहण्यासाठी अनिवार्य असे गर्भाशय आपल्याला नाही. याची त्याला तिव्रतेने खंत जाणवते. प्रेमाची ही अर्थपूर्ण खूण आपण जपू शकत नाही. हे पुरुष म्हणून आपले अपुरेपण आहे या दुरावल्यानंतरही तिच्या प्रेमात आकंठ बुडालेले गुंतलेले प्रियकराचे मन तिची अर्थपणे खूण आठवण आपण जपू शकत नाही या भावनेने बेचैन कसे होते, याचा मार्मिक शब्दांत प्रत्यय देणारी ही कविता आहे. यातून स्त्री  व पुरुष या दोघोंच्या मनातील प्रेमभावाचे निराळेपण ध्यानात येते.

‘‘मेणबत्तीमधील धागा मेणबत्तीला म्हणाला मी जळत
असतो तेव्हा तू का विरघळत असते, मेणबत्ती
म्हणाली ज्याला हृदयात जागा दिली तो सोडून
चालात असेल तर डोळ्यातुन पाणी येणारंच असते.’’

‘‘तुला जायचं होतं तू गेलास
मला गमवायचं होत मी गमवल........
फरक फक्त एवढाच आहे की
तू आयुष्यातला एक क्षण गमावला
आणि मी एक क्षणात पूर्ण
आयुष्य गमावल............’’

‘‘ज्योत जळते प्रकाशासाठी,
चंदन झिजते सुगंधासाठी
सारी सृष्टी फुलते दुसऱ्यांसाठी
प्रत्येकाला वाटत असते,
कुणीतरी जगावे आपल्यासाठी
जीवन तर सगळेच जगतात
जगून तर पहावे एखाद्यासाठी.’’

**प्रजापती शुभम दामोदर**
तृतीय वर्ष कला

# पर्यावरण रक्षणात माझी भूमिका....

मुलांच्या अभ्यासाबद्दल पालकांची चर्चा चालली होती. गप्पा अगदी रंगात आल्या होत्या. सर्व पालकांचे एकच मत होते, किती अभ्यासाचा भार या मुलांवर ? ''किती नवे नवे विषय आणतात हे अभ्यासात ? काय आवश्यकता आहे या परिसर अभ्यासाची ? एकेक फॅड आहे नुसते.'' त्या चर्चेत मध्ये पडून सांगावेसे वाटते, ''बाबांनो, मुलाचे पालक म्हणून तुम्ही तुमची कर्तव्ये पार पाडत नाहीत म्हणून शाळाना हे सर्व करावे लागते.''

म्हणून मी ठरवले ''पर्यावरण रक्षणात माझी भूमिका'' मी व्यवस्थित आणि जबाबदारीने पार पाडेल. आपले घर आणि आपला परिसर यांचा किती परस्परसंबंध आहे. हे तुम्ही आणि मी आपल्या मुलांना शिकवले पाहिजे. परिसराची स्वच्छता किती आवश्यक आहे. हे मुलांच्या मनात ठसवेल. आपला परिसर विशुध्द रहावा म्हणून कधीही कडुलिंब तुळस, दुर्वा यांची आवर्जुन लागवड करेल आता चौकौनी कुठूंबात या गोष्टींना थाराच नाही. स्वाभाविकच ही जबाबदारी समाजाची, म्हणजे ओघाने शाळेची ठरते.

मुंगीपासून गरुडापर्यंत सर्वजण धरतीची प्रकृती सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतात ; पण माणूस मात्र आपल्या बुद्धीमत्तेने आणि कार्यशक्तीने पर्यावरणाचा तोल बिघडवून टाकतो आहे. मानवाचे बेजबाबदार जिणे एक दिवस जग निर्मनुष्य करुन सोडेल, असा धोका वाटत आहे. निसर्गाने माणसाला मुबलक दिलेली हवा आणि पाणी यांचा योग्य उपयोग करण्याऐवजी दुरुपयोगच करतो. आणि त्यावेळी तो भविष्याचा विचार करत नाही. अलीकडे तर शहरांतील माणूस मातीपासून दूर जात आहे. वाढती वृक्षतोड मानवाच्या आस्तित्वावरच आघात करत आहे. माणूस आपल्या सौंदर्याचा विचार करतो; परंतु वसुधरेचय सौदर्याची थोडीही काळजी घेत नाही.

वसुंधरा–विद्रोह करणाऱ्या या अविचारी माणसाला जागे करण्याकरत साऱ्या जगाने '२२ एप्रिल' हा 'वसुंधरा दिन' म्हणून पाळायला सुरवात केली आहे. पर्यावरणाचा हा सर्व सजीवांच्या अस्तित्वाशीच निगडीत असल्याने आंतरराष्ट्रीय ग्राहक संघटनेकडून १९९२ सालापासुन हा वसूंधरा दिन पाळला जातो. त्यासाठी १९८६ साली 'पर्यावरणाचा कायदा' करुन माणसाचा स्वच्छ व आरोग्यपूर्ण पर्यावरणाचा हक्क मान्य केला गेला आहे.

संपूर्ण सुखी, समाधानी भारतभू हे माझे आवडते स्वप्न आहे. म्हणून मी समाजाला किंवा सर्वसामान्य जनतेला पर्यावरणाचे रक्षण करणे हे किती महत्वाचे हे पटवून सागेल. पर्यावरण रक्षण म्हटले म्हणजे वृक्षतोड थांबवणे गरजेचे आहे. ते मी थांबवण्याचे कार्य करेल आणि वृक्ष लागवड आणि त्या वृक्षाचे रक्षण करेल. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मी प्लास्टीक पिशव्या आणि इतर वस्तू प्लास्टीकच्या न वापरता कापडाच्या किंवा कागदाच्या वापरेल आणि हे सामाजलाही पटवुन सांगेल.

पर्यावरण रक्षणात माझी भूमिका मी वृक्षतोड, प्लास्टीक बंदी, घनकचरा, ध्वनी प्रदुषण हे रोखण्यासाठी समाजाला प्रवृत्त करेल आणि जंगल तोड थांबवेल कारण आजकाल बिबटे माणसाच्या वस्तीत शिरुन माणसांवर हल्ले करत असल्याच्या बातम्या वरचेवर कानावर येत असतात. असे का घडते ? जंगल तोड मुळे म्हणून मी ठरवले आहे. जास्तीत जास्त झाड लावण्याचा प्रयत्न करेल आणि पर्यावरणाचे रक्षण करेल. ध्वनी प्रदुषण थाबंवण्यासाठी लग्नसमारंभात असलेले डी.जे.चा.आवाज हा ठरवीक असावा हे लोकाना पटवून सांगेल घरातील टी.व्ही. (टेलीव्हीजनचा) आवाज हा मर्यादित किंवा घरातल्या घरात असावा त्यामुळे पर्यावरणात ध्वनीप्रदुषण होते. हे लोकांना समजावून सांगेल.

पर्यावरण रक्षण हे माझी जबाबदारी आहे म्हणून मी ते उत्तम पार पडेल. भ्रमणध्वनीमुळे सर्व लोक या भ्रमणध्वनीच्या आहारी गेले आहे. त्यामुळे शारीरीक दुष्परिणमही होतात आणि हवेत ही वेगवेगळ्या प्रकारच्या लहरी निर्माण होतात. त्यामुळे पक्ष्यांना, जनावरांना ऐकण्याला त्रास होतो म्हणून मी समाजाला सागण्यांचा प्रयत्न करेन की

तुम्ही जे मोबाईल टॉवर्स लावले आहे. त्यातली रेंज ही विशिष्ट मर्यादीत वापरावी. सरकार मान्य असेल तेवढीवापरावी हे सांगून ते पटवून देइल पर्यावरण हे मनुष्य, प्राण्यांसाठी खुप महत्वाचे आहे.

माणसांची संख्या अविरत वाढत आहे. त्याबरोबर मानवनिर्मित कचरा वाढत आहे. त्यात नष्ट न होणाऱ्या प्लास्टिकचा कचरा वेगळा टाकावा तो गुरांच्या खाण्यात येणार नाही ही काळजी मी घेईल. पर्यावरण रक्षण हे समाजाची जबाबदारी आहे. हे लोकांना सांगेल आणि पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचे थांबवले आजकाल पर्यावरण जपण्याची जाणीव निर्माण झाली आहे त्यासाठी कायदे नियम केले आहेत. हे आचरणात यावीत म्हणून समाजाला, गावाला, शहरातील लोकांना सांगण्याचा प्रयत्न करेल. वाहनचालकांना वाहनासाठी आवश्यक असणारी पी.यु.सी. चाचणी करणे हे महत्वाचे आहे. ते केलीच पाहीजे हे लोकांना सागेल, कारखान्यातील दूषित पाण्याबद्दलची जबाबदारी पार पाडणे हे महत्वाचे आहे. कोरडा कचरा, ओला कचरा यांची विभागणी करणे या लहासहान पण फार महत्त्वाच्या गोष्टी करुन आपणाला विशुध्द पर्यावरण टिकवणे आहे. अशी निष्ठा लोकांच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न करेल.

औद्योगिक क्रांती झाली आणि हा सारा समतोल बिघडला. चक्राच्या शोधानंतर एकापाठोपाठ एक आधुनिक वाहने आली, माणसाची गती वाढली; पण हवेत प्रदुषण निर्माण आले हवेतील या प्रदुषणामुऐ माणसाला श्वासोच्छवासाला त्रास होतो. फफ्फुसाचे, त्वचेचे अजाार होतात. म्हणून प्रदुषण रोखण्यात काम मी करेल.

मानवाचे पर्यावरणाशी नाते फार प्राचीन आहे. म्हणून मी हे नाते जपण्याचा प्रयत्न करेल. आमच्या पुर्वजानी या निसर्गाच्या कुशीत राहुनच वेदांची रचना केली. किंबहुना या निसर्गानेच मानवाला वेळोवेळी समृदध्द केले आहे. म्हणून पर्यावरणाचा रक्षण करणे माझी जबाबदारी आहे म्हणून मी ते सर्वपरीने पार पाडेल.

पर्यावरण हा आमचा अन्नदाता आहे. निसर्गाच्या कुशीत आम्हाला षड्संयुक्त अन्न मिळते. पर्यावरणाने दिलेल्या पाण्यानेच आमची तहान भागते. निसर्गाने दिलेल्या विविध प्रकारची औधष देतो. त्यातूनच आमचा 'आयुवेर्द' समृध्द झाला आहे. पर्यावरणाने केलेले उपकार मनुष्य कधी ही फेडू शकत नाही. प्रदुषणाचे हे संकट काही प्रमाणात कमी करता येईल त्यासाठी मी समाजाला एकत्र आणून जागरुक करेल आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' ही मोहीम प्रचंड प्रमाणात राबविण्याच्या प्रयत्न करेल.

पर्यावरणातील विविध प्राणी, पक्षी, कीटक हे देखील जणू काही माणसाच्या सुखाचांच विचार करतात. मधमाश्याच्या मेहनतीतून माणसाला मधुर मध मिळतो. तुलीच्या पानावर पोसणारा रेशमाचा किडा आपल्या समर्पणातून माणसाला मऊ रेशमी धागा देतो. निसर्ग हा एक मोठा दाता आहे. किंबहुना आपल्याकडे जे जे काही आहे ते दुसऱ्याला द्यावे, हा संदेश निसर्ग पावलोपावली देत असतो. म्हणून आपण ही पर्यावरणाच्या रक्षणाची काही भुमिका बजावली पाहिजे असे मला वाटते. म्हणून या पुढे पर्यावरणाचा ऱ्हास होईल असे कोणतेही कृत्य मी करणार नाही. आणि प्रत्येक वेळेस पर्यावरण रक्षणाची भुमिका पार पाडेल

म्हणून मी पर्यावरण रक्षणाचे शिवधनुष्य उचलेल आहे. आणि असे शिवधनुष्य समाजाने ही जर उचलले तेव्हाच ती प्रगतिपथावर वाटचाल करु शकेल.

**बाविस्कर तेजल सुनिल**
प्रथम वर्ष विज्ञान

# असा असावा देश माझा

''दिन दुर नही खंडित भारत का पुन :
अखंड बनाएंगे, गिलगित से गारो पर्वत
तक आजादी–पर्व मनाएंगे ।
उस स्वर्ग दिवस के लिए आजसे
कमर कसें बलिदान करे
जो पाया उसमे खो न जाए
जो खोया उसका ध्यान करे ।।''

काही दिवसांपुर्वीच माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपयी यांची ही कविता वाचण्यास मिळाली. मनात त्या दिवसापासून असंख्य वादळे निर्माण होवू लागली त्यांच्या कवितेच्या शेवटच्या ओळींनी तर कासावीस करनु सोडल ! जे आपण, आपल्या देशाने मिळवलय ते खुपच अविश्वसनीय आहे ! आपल्या देशाचा इतिहास हा पाच हजार वर्षापुर्वीचा आहे. आपल्या देशात आधिपासुनच समृध्दी नांदत आली आहे. या देशाने जगाला शांततेचा संदेश दिला, आयुर्वेदाची देणगी दिली, शुन्याची निर्मिती करुन आकडे मोडीचे ज्ञान दिले. एकेकाळी ज्या देशाला ''सोनेकी चिडया ''म्हणुन संबोधत केले जात होते. त्यचा देशता आज गरीबी बेरोजगारी दिसायला मिळतेय ! महिलांना युगापासून सन्मान देणाऱ्या या देशात महिलांवर अत्याचार बघावयास मिळतोय ! ज्या देशाने जगाला विविधतेनूत एकतेचा संदेश दिला, त्याच देशात आज धर्मवाद, जातीवाद, दिसतोय खरचं जे आपण मिळवलं त्यात रमुन न जाता जे आपण गमवलं त्याच मंथन करण्याची वेल आलीय ! म्हणुनच असा असावा देश माझा ? या प्रश्नाचे उत्तर शोधयची गरज आलीय !

भारतावर निसर्गाचीही विशेष कृपा आहे. हे यावर जेव्हा संकटे आली, तेव्हा महापुरुषाला जन्म देवुन निसर्गाने आपल्यावर उपकार केले आहेत. सध्याची युवा पिढी अशाच लोकनेत्याच्या प्रतिक्षेत आहे, जो त्यांना नैतिक मुल्यांचे शिक्षण देवु शकेल. एकेकाळी हेच काम महात्मा गांधी यांनी केले होते. भारताची एकता व एकात्मता आज संकटात झाली असल्याचे दिसुन येते. भाततीय राजकारण, संस्कृती, सहिष्णुता यांचीही स्थिती चिंताजनक आहे. आपली स्वत:ची राष्ट्रीय ओळख निर्माण करणे हे भारतासमेरचे प्रमुख उदिष्ट आहे. आपलं सामाजिक रुढी, परंपरा, संस्कृतीची जोपासना करणाऱ्या समाजाचे रक्षण पढील काळात आपल्याला करावे लागेल. आज भारताचे वैशिष्टे मानले जाते ते भारतात असलेल्या विविधतेतुन एकता यामुळे वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक इथे आनंदात राहतात, असो सर्वांना वाटते. परंतु या जाती आणि धर्मामुळेच बरेच वाद येथे निर्माण होत असतात. याच गोष्टीचा फायदा होत काही लोक इथे अशांतता पसरवण्याचा प्रयत्न करीत असतात सृष्टी निर्माण झाली त्यात इतर प्राणीमांत्राप्रमाणे मानवही निर्माण झाला. म्हणजे तोही इतर प्राण्यांसारखाच, फक्त त्याच्या जवळ सशक्त मेंदु होता त्याचा वापर करुन त्याने त्याची प्रगती करुन घेतली. म्हणुन मग तो समाजिक प्राणि झाला. इतर प्राणी मात्र आपआपल्या निसर्गचक्रा प्रमाणे जीवन जगू लागले. माणसाने जाती–धर्मा निर्माण केले, त्याला जीवनाचा मार्ग दाखवण्यासाठी, परंतु त्याचा उपयोग माणुस दुसऱ्याला आपल्यापेक्षा कमीपणा दाखवण्यासाठीच करु लागला. निसर्गाने सर्व माणसे सारके निर्माण केले. कोणाला कमी जास्त अवयव दिले नाहीत, मग हा उच्च निच्च ठरविणारा माणुस कोण? मात्र मारससारखी माणसे धर्मासाठी एकमेकांचा गळा कापू लागली धर्म हा माणसाठी आहे, माणुस धर्मासाठी नाही. म्हणुन माणसांत तेढ निर्माण करणारा हा धर्म, ही जात या देशातूनच नव्हे तर विश्वातून नाहिशी झाली पाहिजे ! प्राणिमांत्रा आहेत का हो जात धर्म ? नाही ना ! म्हणून भारतात कोणातीच जात नको, कोणताच धर्म नका आहे, इथे फक्त माणुस ही जात आणि मानवता हा धर्म असावा ! कोणीच उच्च व निच्च नसावे सर्व एकसमांन असावेत सर्व प्रथम भारतीय असावे ! आणि सर्वांनी मिळुन–मिसळुन गुण्यागोविंदा ने राहावे.

आपल्या देशात एकीकडे श्रीमंत श्रीमंत होत चालले आहेत, पण गरीब मात्र अजुन गरीबच ! मला असे वाटते श्रीमंत व्यक्ती जो दान धर्म करतात, जे सोन–पैसा मंदिरता दान देता त्यापेक्षा एखाद्या गरीब मुलांच्या शिक्षणासाठी खर्च द्या, त्यांच्या उच्च शिक्षणासठी मदत करा, कोण्या गरीब मुलीच कन्यादान करा ! कोण्या बेरोजगार युवकाला छोटा मोठा उद्योग उभारण्यासाठी मदत करा. अशा छोट्या–मोठ्या गोष्टीतूनच आपल्या देशतील गरीबी मिटेले असे मला वाटते. गरीबी ही अर्थिक व शिक्षणाचा अभाव यांमुळेच जास्त वाढत आहे. शिक्षणामुळे माणसाला नैतिक मुल्ये कळतात, व त्याला जीवन जगण्याची नवी आस मिळते. म्हणूनच भारतातील प्रत्येक मुलांना त्यांच्या आवडीचे शिक्षण घेता यावे, शिक्षणासोबतच राष्ट्रीय एकात्मता व आपल्या देशासाठी आपलं काहीतरी देणं लागत असे विचार त्यांच्या मनात रुजवायला हवे तेव्हाच आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांत राष्ट्रप्रेम अधिक मजबूत होईल. ते फक्त स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिना–निमित्त मर्यादित न राहता, प्रत्येक क्षणाला मनात बिंबवले जाईल असे मला वाटते प्रत्येक नागरिकाला वाटले पाहिजे की हा देश माझा आहे आणि मला या देशासाठी काम करायचे आहे.

आपला देश कृषीप्रधान आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा म्हणून संबोधला जातो. परंतु या जगाच्या पोट भरणाऱ्यावर आज भारतात आत्महत्या करायची वेळ येत आहे. ओला दुष्काळ व सुका दुष्काळामुळे आजची परिस्थीती हवालदील झाली आहे. त्यात कर्जाचा बोझा, मुलांचे शिक्षण व दैनंदिन जीवनात लागणाऱ्या खर्च शेतकरी पेलवु शकत नाही. आत्महत्या हा त्यावर उपाय नसुन, प्रत्येक समस्याचे सखोलीने अभ्यास करुन तोडगा निघु शकतो. वर्तमान काळात रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपिकता नाहीशी होत आहे. उत्पादन जरी झाले तरी पिकांना योग्य मोबदला मिळत नाही. मला असे वाटते ज्या ठिकाणी शेतकरी पीक घेवु शकत नाही म्हणजेच सुखा दुष्काळ असो व असुपीक जमीन, त्या जमीनीवर सरकारणे शेतकऱ्याला सौरउर्जा प्रकल्प उभारण्यास मदत करावी जणेकरुन आजचा शेतकरी फक्त  अन्नच नाही तर देशाला वीज निर्मीती करुन देवु शकतो.

भारतामध्ये भ्रष्ट्राचार हा प्रत्येक घटकांतील छोट्या मोठ्या लोकांमध्ये दिसून येतो. एखादे काम लवकर व्हावे. हे प्रत्येकाला वाटते परंतु त्यासाठी जे नियम दिले आहेत. जे कायदे आहेत त्याचे पालन काटेकोरपणे करावे लागेल. जर प्रत्येक भारतीय नागरिकाने मनात ठरवले. की कोरतेही काम हे नियमांचे, कायद्याचे उल्लंघन न करता केले. तर  या देशातील प्रत्येक कामात पारदर्शकता येईल व सर्व जबाबदारीने कामे कारणीभुत असलेल्या प्रत्येक गोष्टीला जळसकट नाहीसे करणे हे प्रत्येक भारतीय नागरीकांचे कर्तव्य आहे.

भारतामध्ये लैंगिक समानतेचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. तसा कायदा आपल्याला अमिरीके मध्ये दिसावयास मिळत नाही. तरीसुध्दा आपल्या देशात महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो. जी पुरुषप्रधान संस्कृती काही लोकांच्या मनात घर करुन बसलीय तीला सुध्दा नाहीशी करायची वेळ आली आहे. शहरांमध्ये वर्तमान काळात जरी महिला पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून कामे करत असल्या तरी गावांमध्ये काहीश्या ठिकाणी हे आपल्याला दिसावयास मिळत नाही. मुलींना त्यांच्या आवडीचे शिक्षण व नोकरी करु दिली जात नाहिय ! या समस्येचे सुध्दा निराकरण व्हायला हवे. महिलांना समानतेच्या अधिकारांसोबतच, तिला मान सन्मान घरादारांत मिळायला हवा. तिच्यावर होणाऱ्या अत्याचारांची तीव्रता लक्षता घ्यालया हवी. ज्या पुरुषाला ती जन्म देते त्य पुरुषांनाच ती फक्त एक उपभोगाची वस्तु न दिसता, तिच्या समर्पक, प्रेमळ, निरपेक्ष वृत्तीचा भाव लक्षात घेता तिला सन्मान द्यावा. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत प्रत्येक नागरिककामध्ये तीच्या बद्दल आदर असावा असे मला वाटते. कारण महिला सशक्तीकरण हे देशांतील विकासाचे लक्षण आहे.

''ईश्वर व्यापिले हे विश्व
म्हणोनी जगाची आम्हा देव
विश्वाचा मुळ घटक गाव

ग्रामगीता तयासाठी
ग्रंथालयातील कामकाज, वाचकांच्या समस्या सोडवण्यासाठी, सेवा व्यवस्थित देण्यासाठी ग्रंथालय सल्लागार समिती गठीत करण्यात आलेली आहे. समितीच्या यावर्षी दोन सभा घेण्यात आल्या. या समितीमध्ये एकुण ८ सभासद आहेत. या ग्रंथालय सल्लागार समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने, उपप्राचार्य डॉ. पी. आर. महाजन, डॉ. एस.ए. पाटील, डॉ. पी.आर. गवळी, प्रा.के.एल. हेरोळे, प्रा.एन.यु. बारी, प्रा. एच.एम.बाविस्कर, प्रा.एस.पी. उमरीवाड हे सदस्य आहेत. तर प्रभारी ग्रंथपाल प्रा.व्ही.एन.रामटेके हे सचिव आहेत. २०१८–१९ या शैक्षणिक वर्षात या समितीच्या दिनांक **७ जुलै २०१७ व ७ जानेवरी २०१८ व ७ मार्च २०१८ अशा एकुण तिन सभा घेण्यात आल्या.**

*** ग्रंथ मांडणी/ग्रंथ वर्गीकरण :–**

ग्रंथालयात ग्रंथ मांडणी ही विषयानुसार केलेली आहे तर ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.मेलविल ड्यूई यांची जगप्रसिद्ध असलेली दशांश वर्गीकरण पद्धतीचा ग्रंथवर्गीकरणासाठी वापर केला जातो.

*** ग्रंथालयाचा देवघेव विभाग :–**

ग्रंथालयामध्ये वाचकांना ठराविक दिवशी ग्रंथ देवघेव न करता कला व विज्ञान या दोन्ही शाखेतील वाचकांना दररोज ग्रंथदेवघेव करण्यात येते. सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत ग्रंथदेवघेव केली जाते. परीक्षाकाळात ग्रंथदेवघेव करण्यासाठी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ग्रंथ देवघेव करता येते. वाचकांनी उशिरा जमा केलेल्या ग्रंथांसाठी प्रती दिवस प्रती ग्रंथ एक रुपया दंड आकारला जातो.

*** ग्रंथालय कर्मचारी :–**

ग्रंथालयामध्ये सध्या प्रभारी ग्रंथपाल म्हणून प्रा.पी.आर.गवळी व प्रा.व्ही.एन.रामटेके यांच्याकडे तात्पुरता पदभार असुन. याशिवाय महाविद्यालयाचे शिपाई श्री. महेंद्र डी. महाजन हे ग्रंथालयात मदतनीस म्हणून कार्यरत आहे.

*** अभ्यासिका कक्षाची व्यवस्था :–**

ग्रंथालयात वाचकांना अभ्यासासाठी अभ्यासिका कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अभ्यासिका कक्षामध्ये ४० इतक्या क्षमतेची वाचकांसाठी बैठक व्यवस्था आहे. तसेच विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांसाठी वेगळी बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## ग्रंथालयातर्फे देण्यात येणाऱ्या सेवा :-

आमच्या ग्रंथालयात खालील सेवा देण्यात येतात;

*** मुक्तद्वार पद्धती :–**

ग्रंथालयीन वाचनसाहित्याचा जास्तीतजास्त उपयोग व्हावा या दृष्टीकोनातून मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. यामुळे वाचकांना सर्व प्रकारचे ग्रंथ बघता येतात.

*** Library Orientation Programme चे आयोजन :–**

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला नवीन वाचकांना ग्रंथालयाची माहिती व्हावी उद्देशाने Library Oritentation Programme चे आयोजन करण्यात आले. यामुळे नविन प्रवेशित वाचकांना ग्रंथालयाविषयी आपुलकी तसेच जिज्ञासा निर्माण होते.

*** ग्रंथालय तासिकेचे आयोजन :–**

ग्रंथालयातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा–सुविधा वाचकांना माहिती व्हाव्यात तसेच वाचकांच्या ग्रंथालयाविषयी असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी ग्रंथालय तासिकेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना ग्रंथालयासंबंधी

इंटरनेट सेवा, झेरॉक्स सेवा, बुक बँक सेवा इत्यादींची सविस्तर माहिती दिली.

**❊ संदर्भ विभाग :–**

संदर्भ विभाग हा कोणत्याही ग्रंथालयाचा कणा असतो. आमच्या ग्रंथालयात सुसज्ज असा संदर्भ विभाग आहे. यामध्ये मुख्यत्वे भारतीय राज्यघटना, New Encyclopedia Brittanica (एकुण ३२ खंड), दशांश वर्गीकरण पद्धती (२३ वी आवृत्ती), रसायनशास्त्र, गणित, विज्ञान, English Best Literature, Hinduism and Buddhism, मराठी, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, वनस्पतीशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, मानव अधिकार शिक्षण, बँकिंग ॲन्ड फायनन्स इत्यादी विषयाचे विश्वकोश आहेत. याशिवाय आदर्श मराठी शब्दकोश, Oxford Dictionary, नकाशासंग्रह, विविध समाज सुधारकांचे चरित्रे, जळगाव जिल्हा गँझेटीअर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम ग्रंथसंग्रह, साने गुरुजी संग्रह, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन चरित्रावर आधारित १८५ पेक्षा जास्त ग्रंथसंग्रह अशी दुर्मिळ ग्रंथसंपदा आहे.

**❊ Book Bank Service :–**

ग्रंथालयात तृतीय वर्ष रसायनशास्त्र आणि संगणकशास्त्र या विषयांच्या वाचकांना Book Bank सेवा देण्यात येते. यामध्ये प्रत्येक वाचकाला संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी एकूण १२ पुस्तके देण्यात येतात.

**❊ Inter Library Loan Service :-**

वाचकांसाठी ग्रंथालयात एखादे वाचन साहित्य उपलब्ध नसेल तर आंतर ग्रंथालय योजनेअंतर्गत श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर तसेच धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, मु.जे. महाविद्यालय, जळगाव तसेच संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर येथून ग्रंथ घेण्याची सुविधा करुन देण्यात आली आहे.

**❊ ग्रंथालय संगणकीकरण :–**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती तंत्रज्ञान हे प्रत्येक ज्ञानशाखेसाठी आवश्यक झालेले आहेत. याचाच एक भाग म्हणून आमच्या ग्रंथालयात संगणकीकरणासाठी SOUL 2.0 या संगणक प्रणालीचा वापर करण्यात येतो. INFLIBNET, अहमदाबाद या संस्थेकडून हे सॉफ्टवेअर घेण्यात आलेलेल आहे. आमचे ग्रंथालय अंशत: संगणकीकृत आहे.

**❊ OPAC ची सुविधा :–**

ग्रंथालयात OPAC (Online Public Access Catalouge) ची सुविधा आहे. ग्रंथ शोधण्यासाठी त्याचा उपयोग होऊन वाचकांचा वेळ वाचतो.

**❊ Internet Service :-**

ग्रंथालयात वाचकांसाठी इंटरनेट सेवा देण्यात येते. त्यासाठी एकूण ८ संगणक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**❊ N-List Service :-**

INFLIBENT, अहमदाबाद यांच्यामार्फत वार्षिक ५७५० रु. शुल्क भरुन वाचकांना N-List सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यामध्ये वाचकांना १,३०,००० ई–पुस्तके आणि ६३०० पेक्षा जास्त ई–मासिके ऑनलाईन बघता येतात, तसेच जतन करता येतात.

**❊ E-mail Service :-**

वाचकांना ई–मेल सेवा देण्यात येते. यामध्ये ज्ञानवृद्धीपुरक, चर्चासत्रे, शासननिर्णय, अभ्यास विषयक माहिती दिल्या जाते.

**✻ Print/Reprography Service :-**

महाविद्यालयातील सर्व वाचकांना, तसेच बाह्यगत वाचकांसाठी Print/Reprography सेवा देण्यात येते.

**✻ New Arrivals ची सुविधा :–**

ग्रंथालयात प्रत्येक महिन्याला ग्रंथ खरेदी करण्यात येते. या सर्व ग्रंथांची यादी सूचना फलकावर लावण्यात येते. तसेच नवीन आलेल्या ग्रंथांची सुचना फलकारव प्रसिद्धी देण्यात येते. यामुळे वाचकांना ग्रंथालयात आलेल्या नवीन ग्रंथांची माहिती होते.

**✻ व्यवसाय विषयक मार्गदर्शन :–**

ग्रंथालयात नोकरी विषयक जाहिरातीसाठी स्वतंत्र सुचना फलक आहे. या सुचना फलकावर रोजगार, नोकरीविषयक जाहिरातींचे कात्रणे लावण्यात येतात. याचा वाचकांना रोजगार, नोकरीविषयक संधी शोधण्यासाठी फायदा होतो.

**✻ External Membership ची सुविधा :–**

महाविद्यालयीन वाचकांप्रमाणेच इतर वाचकांना ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी External Membership ची सुविधा आहे. या वाचकांना ग्रंथालय नियमानुसार सर्व सेवा देण्यात येतात.

**✻ ग्रंथ/मासिके बांधणी :–**

ग्रंथालयात दरवर्षी जीर्ण, फाटलेल्या ग्रंथाची तसेच मासिके/नियतकालिके यांची बांधणी केली जाते व ते वाचकांना अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिले जातात.

**✻ Newspaper Clipping Service :-**

रोजगार विषयक जाहिराती, महाविद्यालयात होणाऱ्या विविध घडामोडी विषयी वर्तमान पत्रामध्ये आलेली माहिती जतन करण्यात येते.

**✻ प्राथमिक उपचार सुविधा :–**

ग्रंथालयामध्ये किरकोळ दुखापत दुरुस्तीसाठी प्राथमिक उपचार सुविधा देण्यात येते.

**✻ जुन्या प्रश्नपत्रिका पुरविण्याची सुविधा :–**

ग्रंथालयात सर्व वाचकांना सर्व वर्गाच्या जुन्या प्रश्नपत्रिका पुरवण्यात येतात. याचा वाचकांना परीक्षेच्या तयारीसाठी मदत होते.

**प्रा. व्ही. एन. रामटेके**
**प्रा. पी. आर. गवळी**
प्रभारी ग्रंथपाल

## प्राध्यापक प्रबोधिनी मंडळ-
## अहवाल २०१८-१९

सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालयात चालु शैक्षणिक वर्षात प्राध्यपक प्रबोधिनी मंडळाची स्थापना होवून उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक मंडळाचे सचिव प्रा. व्ही.एच.पाटील यांनी केले. या वेळी चेअरमन प्रा. डॉ. के.जी.कोल्हे व मंडळातील सर्व सदस्य व प्राध्यापक वर्ग उपस्थीत होते.

मंडळामार्फत विद्यार्थी हितावह कार्यासाठी तसेच प्राध्यापकांच्या गुणवत्तेत वाढ, बदलेल्या शैक्षणिक धोरणातील भूमिकांवर आव्हाणात्मक चर्चांवर विशेष भर देण्यात येवून तज्ञ प्राध्यापकांमार्फत मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्यानांचे आयोजन झाले. या बरोबरच प्राध्यपकांनी प्राप्त केलेली विविध यश, विद्यापीठातील विविध पदावरील निवड याबाबत येथोचित सन्मान मंडळामार्फत केला गेला. पी.एच.डी. प्राप्त प्रा.डॉ.जे.पी.नेहेते, सिनेट सदस्य डॉ. के.जी.कोल्हे, प्रा.एन.यू.बारी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवड झालेले प्रा. एन.यु.बारी, स्थायीसमीती सदस्य म्हणून निवड झालेले डॉ. के.जी.कोल्हे, वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड झालेले डॉ. एस.ए.पाटील यांचा सत्कार करण्यात आला. वर्षभरात मंडळाच्या मार्गदर्शनासाठी प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले, मंडळातील सर्व सदस्य, प्राध्यापकवृंद यांचेही सहकार्य लाभले.

डॉ. के.जी. कोल्हे
चेअरमन

---

## विद्यार्थी विकास मंडळ वार्षिक अहवाल
## शैक्षणिक वर्ष - २०१८-१९

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता. रावेर,जि.जळगाव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली या महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा शैक्षरिक विकासाबरोबर सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक, व्यक्तिमत्व विकास आणि राष्ट्रासाठी सुद्दढ, सर्वगुण संपन्न युवा पिढी निर्माण करणे हा उद्देश आहे. त्यासाठी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे मा.प्र.संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षात विविध शिबीरे, कार्यशाळा, थोर महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथी साजरे करण्यात आलेले आहे. तसेच केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्या आदेशान्वये विविध योजना, कार्यक्रमाची आमच्या महाविद्यालयात मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास मंडळाकडून अंमलबजावणी करण्यास पुरेपूर प्रयत्न झालेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वपूर्ण होता. त्यांचा सहभाग अधिकाधिक वाढवा यासाठी वेळोवेळी वर्गात सूचना फिरवणे, नोटीस बोर्डावर जाहीर सूचना लावणे, प्रत्यक्ष वर्गात जाून सूचना–मार्गदर्शन, प्रोत्साहन करणे इत्यादी कार्य आवर्जुन करण्यात आले.

त्यातील काही महत्वपूर्ण कार्यक्रमाची व योजनांची आढावा–अहवाल पुढील प्रमाणे

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
२) अर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना
३) विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना
४) वैदयकीय तपासणी शिबीर
५) राज्यशासन खुली शिष्यवृत्ती योजन
६) छत्रपती राजर्षी शाहूमहाराज शिष्यवृत्ती
७) युवारंग युवक महोत्सव
८) रॅगींग प्रतिबंधक समिती
९) विविध कार्यशाळा व शिबीरे
१०) मतदार जनजागृती कार्यशाळा
११) विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा
१२) स्वयंसिध्दा अभियान
१३) विद्यापीठ स्तरीय मैत्री कार्यशाळा
१४) स्नेहसंमेलन

अशाप्रकारे राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाची योजनांची, शासकीय उपक्रमाची माहिति विवरण थोडक्यात खालील प्रमाणे –

१) शैक्षणिक वर्ष २०१८–१९ या वर्षासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी विकास मंडळ सल्लागार समिती गठण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.पी.उमरीवाड व युवतीसभा प्रमुख प्रा. डॉ.एन.एस.वाणी तसेच सदस्य म्हणून प्रा.डॉ.पी.आर महाजन, प्रा.डॉ.आर.व्ही.भोळे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.व्ही.एच.पाटील, प्रा.डॉ.एस.एन.वैष्णव प्रा.व्ही.एन.रामटेके यांची निवड करण्यात आली. सदर समितीमार्फत वर्षभरात राबविण्यात येणार असलेलया कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात येऊन त्याच्या अंमलबजावणीची रुपरेषा निश्चीत करण्यात आले.

२) शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विद्यापीठ स्तरावर आंतर महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेसाठी महाविद्यालयाने आपला सहभाग नोंदविला. नियतकालिक सरदार २०१७–१८ हा अंक रौप्य महोत्सवी विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वाटचाल मुखपृष्टाद्वारे दाखविण्याचा कु.पाटील ऋतुजा नरेंद्र, तृतीय वर्ष विज्ञान, हिने प्रयत्न केलेला आहे. २५ वर्षानंतर महाविद्यालयाचे एक वटवृक्षात रुपांतर झालेले दिसत आहे.

३) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :– या योजनेनुसार गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणखर्चाचा काही हिस्ता आपल्या मेहनतीतून भागवता यावे, शिक्षणाबरोबर श्रममूल्य–श्रमसंस्काराची जाणीव विद्यार्थी दशेपासून व्हावी ही हेतू आहे. विद्यापीठाच्या मान्यतेनुसार विद्यार्थी संखेच्या आधारावर सहा विद्यार्थ्यांची निवड विद्यार्थी विकास मंडळामार्फत करण्यात आले. यामध्ये – १) कु. तायडे अश्विनी किशोर (एफ.वाय.बी.एस्सी), २) पाटील राजेश रमेश (एफ.वाय.बी.एस्सी), ३) काटकर योगेश रमेश (एफ.वाय.बी.एस्सी), ४) अहिरे विशाल छगन (एस.वाय.बी.एस्सी), ५) पाटील विठ्ठल बाळू (टी.वाय.बी.एस्सी), ६) कोंघे गणेश अशोक (एस.वाय.बी.ए) या विद्यार्थ्यांच्य निवड यादीला विद्यापीठाची मान्यता मिळाली. वर्षभरात महाविद्यालयातील परिसरातील गवत काढणे, झाडांना आळे करणे, पाणी देणे, ग्रंथालयाता पुस्तके रचणे, शिक्के मारणे, कॉम्प्युटर ऑपरेटिंग, कार्यालयीन–ग्रंथालयीन सयाय्यभूत कामे या विद्यार्थ्यांनी दैनंदिन तासिका संपल्यानंतर केलेले आहे. त्यांच्या सहभागानुसार मानधन देण्यात आले. याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे.

४) शासकीय आदेशान्वये विद्यापिठाच्या निर्देशानसुार महाविद्यालयात रॅगींग प्रतिबंध समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने तर सचिव पदी प्रा.डॉ.पी.आर.महाजन होते. प्रा.डॉ.के.जी.कोल्हे, प्रा.डॉ.रेखा पी.पाटील, प्रा.एम.के.सोनवणे, डॉ.नीता वाणी,प्रा.डॉ.पी.आर.गवळी आणि प्रा.डॉ.डी.बी.पाटील व प्रा.एस.पी.उमरीवाड हे सदस्य पदी होते.

५) विद्यापिठाच्या निर्देशानुसार विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना आणि दरवर्षाप्रमाणे प्रथम वर्ष बी.ए.व बी.एस्सी वर्गातील विद्यार्थ्यांची आरोग्य (वैद्यकीय) तपासणी दि. १८/०९/२०१८ रोजी करण्यात आली यासाठी ऐनूपर येथील डॉ.आर.एल.पाटील, डॉ.सचिन पाटील, डॉ.संदीप चौधरी (विटवा), व ऐनपूर येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डाॅ.एस.डी.महाजन आणि महाविद्यालयाचे प्रा.डाॅ.पी.आर.महाजन, प्रा.डाॅ.आर.व्ही.भोळे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.व्ही.एच.पाटील यांचे या कामी अनमोल सहकार्य लाभले.

६) विविध कार्यशाळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्टअ विद्यापीठ, जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐपनूर यांच्या संयुक्त विद्यायमाने दि.१४/०९/२०१८ रोजी एकदिवशीय रोजगार कौशल्य विकसन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी रावेर, फैजपूर, भालोद, यावल, मुक्ताईनगर, भुसावळ, जळगाव इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक या कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेमध्ये विविध महाविद्यालयातून एकूण ८९ विद्यार्थ्याचा सहभाग होता. दि. १५/०९/२०१८ रोजी जागतिक तापमान वाढीचा वातावरणावर होणारा परिणाम या विषयावर विद्यापीठास्तरीय एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले होते. तापमान वाढीचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सांगण्यता आले. त्यावरील उपाय योजना ई.विषयी जाणीव जागृती करण्यात आले. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातून एकूण ९८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. दि. ०३/१०/२०१८ ते ११/१०/२०१८ या दरम्यान महाविद्यालयात विद्यार्थीनिसाठी स्वयंसिध्दा अभियान (कराटे) शिबीर घेण्यात आले. विद्यापीठ नियुक्त कराटे मास्टर श्री. राजेंद्र अर्जुन सुरवाडे यांनी विद्यार्थीनिा कराटेचे प्रशिक्षण दिले. या अभियानात एकूर ६५ विद्यार्थिनिनी सहभाग घेतला होता.

७) विद्यापीठस्तरीय तिन दिवशीय मैत्री कार्यशाळा :– विद्यापीठस्तरीय तिन दिवशीय मैत्री कार्यशाळा घेण्याचे बहुमान विद्यापिठाने या वर्षी आमच्या महाविद्यालयाला दिले. त्यासाठी विद्यापिठाच्या संयुक्त विद्यामाने दि. ०१/०१/२०१९ ते ०३/१०/२०१९ या कालावधीत मैत्री कार्यशाळा संपन्न झाले. विद्यापिठाच्या निर्देशानुसार संयोजन समिती गठीत करुन त्याद्वारे कार्यक्रमाचे संचालन करण्यात आले. त्यामध्ये बौध्दिक सत्रात पहिल्या दिवशी प्रा.डॉ.पवन पाटील हे मैत्री निसर्गाशी, प्रा.डॉ.दयाघन राणे यांनी मैत्री विज्ञानाशी, प्रा.डॉ.जी.आर.ढेंबरे आणि प्रा.एस.डी.धापसे यांनी मैत्री आणि युवक या विषयावर व्याख्यान दिलेले आहे. तर दुसऱ्या दिवशी प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी मैत्री भावना विकास, प्रा.डॉ.जतीन मेढे यांनी मैत्री साहित्याशी, प्रा.डॉ.साहेबराव पडलवार यांनी मैत्री समाजाशी तर प्रा.डॉ.जयेंद्र लेकुरवाळे सरांनी समाज माध्यमे आणि मैत्री या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी मैत्री आणि संवाद या विषयावर प्रा.डॉ. राजेंद्र देशमुख यांनी व्याख्यान दिले तर प्रा.व.पु.होले सरांनी मैत्री राष्ट्राशी या विषयावर मार्गदर्शन केले. रोज सकाळी ६ ते ७.३० या वेळेत योग प्राणायम आणि व्यायाम घेण्यात आले. संध्याकाळी मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. रात्री ८ ते १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्या गेले. या कार्यशाळेचे मुख्य उद्देश मैत्रीतून सुदृढ समाज आणि राष्ट्रीय एकात्मता घडविणे हे होते. या कार्यशाळेत विद्यापीठ क्षेत्रातील विविध महाविद्यालयातून एकूण १२२ विद्यार्थ्यांना सहभाग घेतला होता.

८) चर्चासत्र आणि परिसंवाद :– विद्यार्थी विकास विभागामर्फत वर्षभरात विविध विषयावर चर्चासत्रे आणि परिसंवाद घेण्यात आले. दि. ११ सस्टेंबर २०१८ रोजी स्वामी विवेकानंद यांचे शिकागो येथील सर्वधर्म परिषदेतील ऐतिहासिक भाषणाला १२५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने व्याक्यान घेण्यात आले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ ऑक्टोबर २०१८ रोजी मुले–मुली वयात येताना या विषयावर परिसंवाद घेण्यात आले.

दि. १२ ऑक्टोबर २०१८ रोजी महिला सबलीकरण वास्तव आणि व्यथा या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने दि. २१/०१/२०१९ रोजी निबंध, वक्तृत्व, पोष्टर, रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यशस्वी विद्यार्थ्यांना दि. २३/०१/२०१९ रोजी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी विद्यापीठात पाठविण्यात आले. दि. २५/०१/२०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आले त्यानिमित्ताने मा.श्री.विजयकुमार ढगे, तहसिलदार, रावेर, यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

९) अर्थिक दुर्बल घटक योजना :– अर्थिक दुर्बल घटक योजनेंतर्गत चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्य योजनेमध्ये महाविद्यालयामार्फत १३ विद्यार्थ्यांची शिफारस करण्यात आलेली होती. त्यात अनु:जाती, अनु:जमाती, विजाभ, विमाप्र, इमाव या मधून विद्यापिठाने १३ विद्यार्थ्यांना रुपये ५२५००/– अर्थसहाय्य मा.कुलगुरु महोदयांनी मान्य केले. त्या रक्कमेचे वितरण चेकद्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आले.

१०) युवारंग युवक महोत्सव २०१९ :– युवारंग युवक महोत्सव २०१९ चे आयोजन ह्या वर्षी जी.एच. रायसोनी कॉलेज इंजिनिअरींग एण्ड मेनेजमेंट, जळगाव येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातून एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभगा घेतला होता. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा.एस.पी.उमरीवाड व प्रा.मोहिनी भंगाळे होते. यामध्ये भारतीय लोकसंगीत या कलाप्रकारत महाविद्यालयाला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने व प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

११) रंगोत्सव आणि बक्षिस वितरण सोहळा :– महाविद्यालयात दि. १६/०२/२०१९ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन रंगोत्सव साजरे करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जम्मू–काश्मीर मधील पुलवामा येथे आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करुन कार्यक्रमाला सुरु करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटन ऐनपूर प.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष मा.भागवत भाऊ पाटील हे होते. प्रमुख पाहुणे ऐनपूर प.शि.प्र.मंडळाचे सचिव मा.संजय भाऊ पाटील हे होते. तसेच संचालक मंडळाचे सन्माननीय सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.पी. उमरीवाड यांनी केले तर वार्षिक अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा.डॉ.पी.आर.महाजन यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.व्ही.एन.रामटेके व प्रा. एस.आर.इंगळे यांनी केले, प्रमाणपत्राचे वितरणाचे सूत्र संचालन प्रा.व्ही.एच.पाटील यांनी केले. तर आभार प्रा.एस.एन.वैष्णव यांनी मानले.

त्यानंती सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मिमिक्री, विडंबन, नृत्य, गीतगायन, नाटक, देशभक्तीपर गायद इ. कला सादर केले.

१२) महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात वेळोवेळी थोर महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथी साजरे करण्यात येतात. त्या निमित्ताने प्रतिमा पूजन व माल्यार्पण केले जाते. विविध व्याक्यातांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत असतात. यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंडेकर, छ. शिवाजी महाराज जयंती, छ.शाहू महाराज जयंती, सरदार पटेल, संत गाडगे महाराज, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम य ा व अशा राष्ट्रपुरुषांचे जयंती व पुण्यतिथी साजरे करण्यात आले.

१३) मतदार जनजागृती अभियान :– महाविद्यालयात मतदान आणि मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. त्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर नोडल अधिकारी प्रा.एच.एम.बाविस्कर व सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून प्रा.एस.पी.उमरीवाड यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच कॅम्पस अम्बेसेडोर म्हणून विश्वनाथ कोळी हा विद्यार्थी प्रतिनिधी आणि कु. अंकिता रमेश चौधरी ही विद्यार्थिनी प्रतिनिधी यांची निवड करण्यात आली. त्याद्वारे महाविद्यालयात

महाविद्यालयात निबंध, पोस्टर, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आले. त्यातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आले. दि. ०७/०३/२०१९ रोजी मा. तहसिलदार, रावेर, मा.उषाराणी देवगुणे यांनी VVPAT मशिन चे प्रात्यक्षिक दाखवून त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करवून घेतले. विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले.

१४) विविध कार्यशाळेत प्रतिनिधित्व :– विद्यापीठामार्फत आयोजित विविध कार्यशाळेत – विविध महाविद्यालयात होणाऱ्या कार्यशाळेसाठी महाविद्यायालयातील विद्यार्थी– विद्यार्थिनी सहभाग घेऊन आपल्या व्यक्मिमत्व विकासात वाढ करतात. दि. २१ ते २२ सप्टेंबर २०१८ या दरम्यान विद्यापीठ स्तरीय संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगाव येथे आयोजित कार्यशाळेत दोन विद्यार्थी सहभाग झाले. दि. ०५/०१/२०१९ रोजी विद्यापीठ स्तरीय विद्यार्थिनी व्यकितमत्व विकास कार्यशाळा, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता.यावल, जि.जळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १० विद्यार्थीनिनी सहभाग नोंदविला. दि. ०७/०१/२०१९ रोजी भालोद कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे विद्यापीठ स्तरीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत ०६ विद्यार्थीनी सहभाग घेतला हाता. दि. २३/०१/२०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस स्पर्धा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे आयोजित स्पर्धेत ०५ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. दि. २८/०२/ २०१९ रोजी व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेर येते विद्यापीठस्तरीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत १० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. दि. ०१/०३/२०१९ रोजी विद्यापीठ स्तरीय रोजगार कौशल्य विकासन कार्यशाळा, व्ही.एस.नाईक महाविद्यालय, रावेर, जि.जळगाव येथे आयोजित कार्यशाळेत १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**प्रा. एस.पी.उमरीवाड**
विद्यार्थी विकास अधिकारी समन्वयक

# क्रीडा विभाग (जिमखाना विभाग) अहवाल २०१८-१९

सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध खेळात समाधानकारक कामगीरी बजावली आहे. महाविद्यालयांच्या जिमखाना डे प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने, जिमखाना समिती सदस्य डॉ.के.जी. कोल्हे, उपप्राचार्य डॉ.पी.आर.महाजन, के.बी.सी. उत्तर महाराष्ट्र विद्यपीठाचे व्यवस्थापक समितीचे सदस्य प्रा.एम.यु.बारी यांच्या हस्ते विविध पातळीवर खेळेलेले खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात आले.

**१) बेसबॉल –** सदर आंतर महाविद्यालयी, स्पर्धा एम.जे.कॉलेज जळगाव येथे पार पाडल्या त्यात एकूण पंधरा खेळाडूंचा सहभाग होता.

**२) क्रिकेट –** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा डी.एन.कॉलेज फैजपूर येते पार पडल्या एकूण १६ खेळांडूनी सहभाग होता .

**३) स्विमिंग –** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा एम.जे.कॉलेज जळगाव येथे पार पाडल्या त्यात एकूण ४ खेळाडू सहभाग झाले होत . १०० लिटर फ्रिस्टाईल २०० लिटर ४०० लिटर व १००X४०० रिले मात सहभाग होता.

**४) सॉप्टबॉल –** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा एम.जे.कॉलेज जळगाव येथे पार पडल्या यात एकूण १५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला कु. रमेश पवार एस.वाय.बी.ए.यांची आंतर विभागीय स्पर्धेत निवड झाली होती.

**५) क्रॉस एंन्ट्री –** सदर आंतर महाविद्यालयीन १२.५ किलोमीटर पळणे स्पर्धा एस.एम.महाविद्यालय ईनगर येथे पार पाडल्या यात एकूण ५ खेळाडुंनी आपला सहभाग नोंदविला होता.

**६) क्रिकेट (महिला) –** सदर आंतर महाविद्यालयीन क्रिकेट महिला आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धा स.व.प. कला व विज्ञान ऐनपूर येथे पार पडल्या होत्या. त्यात कु. प्रियंका सतिष पाटील एफ.वाय बी.एस्सी. हिचा सहभाग घेऊन तिची आंतरविभाग स्पर्धेत सहभागी झाली.

**७) मैदानी स्पर्धा –** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा डी.एन.कॉलेज फैजपूर येथे पार पडल्या यात एकूण ३ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

सन २०१८ या वर्ष प्रथमच के.बी.सी. उत्तर महाराष्ट्र विद्यपीठ जळगाव यांनी नेमुन दिलेल्या कमिटी ....... यांनी महाविद्यालय भेट दिली होती त्याच प्रमाणे स.न.२०१८–१९ या वर्षी यु.जी.सी.नँक पिअर कमिटी यांनी जिमखाना विभागाला भेट देत चांगली कामगीरी आहे. असे सभेत सांगीतले.

**– आंतर विभागीय खेळाडू –**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | बेसवार चेतन भाउराव | – | स्विमिंग | – | जळगाव |
| २) | उमेश जवाहर पवार | – | बेसबॉल | – | चाळीसगाव |
| ३) | उमेश जवाहर पवार | – | सॉप्टबॉल | – | जळगाव |
| ४) | प्रियंका सतिष पाटील | – | क्रिकेट | – | शहादा |

**– आंतर विद्यापीठ खेळाडू –**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | उमेश जवाहर पवार | – | बेसबॉल | – | हरिमान |
| २) | प्रियंका सतिष पाटील | – | क्रिकेट | – | नागपूर |

जिमखाना विभागाच्या विशाल कारभारात प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, डॉ.के.जी.कोल्हे, क्रिडा संचालक प्रा. सचिन झोपे, डॉ. पी.आर.गवळी, प्रा.एन.यु.बारी, प्रॉ.सौ.डॉ.रेखा पाटील, मुख्यलिपीक श्री.गोपाळ महाजन यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.सचिन झोपे**
क्रिडा प्रमुख (जिमखाना विभाग)

## विद्यार्थी समुपदेशन केंद्र
## अहवाल २०१८-१९

महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन केंद्रामार्फत कार्यशाळेचे आयोजन दि. १५/०३/२०१९ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे समन्वयक व समुपदेशक प्रा.व्ही.एन.रामटेके, विद्यार्थी समुपदेशन केंद्र व चाचणी केंद्र, मानसशास्त्र विभाग, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांनी विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ व शारीरिक स्वास्थ योग्य ठेवायचे असेल व स्मृतीमध्ये सुधारणा करायची असेल तर रोज ध्यान करणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.के.एल.हेरोळे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास करुनच परिक्षा द्यावी असे मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.एन.एस.वाणी यांनीही परिक्षे संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजनाकरिता कार्यशाळेचे समन्वयक समुपदेशन केंद्राचे समुपदेशक प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.आर.पी.पाटील यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रा. व्ही.एन.रामटेके**
समन्वयक

## सामाजिक शास्त्र मंडळ अहवाल २०१८-१९

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालयात सामाजिकशास्त्र मंडळातर्फे शै.वर्ष २०१८–१९ मध्ये घेतलेल्या कार्यक्रमाचे अहवाल पुढील प्रमाणे :–

**१) सामाजिकशास्त्र मंडळाचे उद्घाटन :–** लो. टिळक पुण्यतिथी व अण्णभाऊसाठे जयंती १ ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली त्यानिमित्ताने सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.के.एल.हिरोळे होते. त्यांनी आपल्या व्याक्यानात लो.टिळकांचे व अण्णाभाऊ साठे यांचे जिवन कार्ये विद्यार्थ्यांना सांगितले या कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती प्रा.एस.पी.पी.उमरीवाड, प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.डॉ.एन.एस.वाणी हे होते.

**२) जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन :–** या कार्यक्रमाचे आयोजन ९ ऑगस्टला करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने व प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.के.एल.हिरोळे व प्रा.व्ही.एन.रामटेके हे होते. यांनी आदिवासी चळवळ आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील, क्रांतीकारकांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. नेहा महाजन हिने केले तर अभार रितेना पाटील यांनी मानले.

**३) गांधी जयंती :–** २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते व या कार्यक्रमाचे आयोजक प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा या तत्वाचे महत्व, म.गांधीचे जिवन चरित्र माझे सत्याचे प्रयोग यातील दाखले देत विद्यार्थ्यांना महत्व पटवून

दिले. प्राचार्य डॉ.जे.बी.अंतजने यांनी म.गांधीजीच्या जीवनावरील बोधकथा सांगितली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. निकीता पाटील हिने केले. तर अभार किरण कोळी यांनी मानले.

**४) मानवी हक्क दिन :-** १० डिसेंबर २०१८ रोजी मानवी हक्क दिन या कार्यक्रमचो आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते व प्रमुख वक्ते प्रा.के.एल.हिरोळे यांनी मानवी हक्कांचा युनोचा जाहिरनामा विद्यार्थ्यांना सांगितला. तसेच प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना यांचा संबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमाचें सुत्रसंचालन कु. कांचन चौधरी हिने केले तर आभार अश्विनी चौधरी हिने मानले.

**५) महिला दिन :-** ८ मार्च २०१९ रोजी जागतिक महिला दिन या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.रेखा पी.पाटील आणि प्रा.डॉ.एन.एस.वाणी हे होते. त्यांनी आपले विचार व्यक्त करतांना जागतिक महिला दिनाचा ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगीतली स्त्री–पुरुष समानता बेटी बचाव बेटी पढाओ, लिंग समानता, स्त्री–शिक्षण अशा विविध मुद्दयांवर भाष्य केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.उपप्राचार्य डॉ. निता वाणी

**प्रा. एस.पी. उमरीवाड**

समन्वयक

# रसायनशास्त्र विभाग

महाविद्यालयातील विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्र हा विषय विशेष स्तरावर १९९५–९६ या वर्षापासून सुरु करण्यात आला. विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा. डॉ. सतीश. नथूदास. वैष्णव (विभाग प्रमुख)
२) प्रा. सुनील रमेश इंगळे (सहाय्यक प्राध्यापक)
३) प्रा. डॉ. दिपक भगवान पाटील (सहाय्यक प्राध्यापक)
४) प्रा. डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते (सहाय्यक प्राध्यापक)

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार औद्योगिक सहलीसाठी श्री साईराम प्लास्टिक व इरिगेशन, रावेर येथे दिनांक १४/०३/२०१९ रोजी भेट देण्यात आली. सदर इंडस्ट्री मध्ये ठिबक सिंचनात वापरल्या जाण्याऱ्या विविध प्रकारच्या नळ्याचे उत्पादन केले जाते. सदर उत्पादन प्रक्रियेचे विश्लेषण श्री. भरत पाटील यांनी केल. विद्यार्थ्याना उत्पादन प्रक्रियाा समजावून सांगितली व विद्यार्थ्याच्या विविध शंकांचे निरसन केले. सदर सहलीचे आयोजन डॉ. वैष्णव, प्रा.इंगळे, डॉ. पाटील, आणि डॉ. नेहेते यांनी केले. विभागाने सुरु केलेल्या सॉईल आनलिसिस सटिफिकेट कोर्से साठी एकूण १६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. डॉ. दिपक पाटील यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची २०१८–१९ पासून पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली. त्यांच्या मार्गनर्शनाखाली २ विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत.

शासकीय होळकर विज्ञान महाविद्यालय, इंदूर येथे दिनांक ०३/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ रोजी राष्ट्रीय परिषदेत डॉ. दिपक पाटील, प्रा. सुनील इंगळे, डॉ. सतीश वैष्णव आणि डॉ. जयंत नेहेते यांनी Role of enzymes in industrial process या विषयावर पेपर सादर केला. डॉ. सतीश वैष्णव आणि डॉ. जयंत नेहेते यांनी सेवासदन महाविद्यालय, बुऱ्हानपूर येथे ११/०२/२०१९ ते १२/०२/२०१९ रोजी राष्ट्रीय परिसंवादात PH metric study of substtituted heterocyclic drugs with transition metals in mixed solvent या विषयावर पेपर सादर केला. तर डॉ. दिपक पाटील यांनी Application of Schiff base as a fluorescence sensor या विषयावर पेपर सादर केला. विभागातील प्राध्यापकांनी शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये एकूण ८ शोधनिबंध प्रकाशित केले. डॉ. सतीश वैष्णव आणि प्रा. सुनील इंगळे यांनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथे दिनांक २३/०२/२०१९ रोजी द्वितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या रसायनशास्त्र विषयाच्या सिल्याबस रीस्ट्रक्चारिंग कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मधील विभागाचा निकाल खालील प्रमाणे आहे.

तृतीय वर्ष विज्ञान

१) पाटील ऋतुजा नरेंद्र (९१.८०) – प्रथम क्रमांक
२) पाटील आकांक्षा अशोक (८३.१८) – द्वितीय क्रमांक
३) विशाल भास्कर (८३.०३) – तृतीय क्रमांक

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विषयाच्या गुणवत्ता यादीत पाटील ऋतुजा नरेंद्र या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक मिळविला. ज्या विद्यार्थ्याने विशेष क्रमांक प्राप्त केला अशा सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेचे संचालक मंडळ, प्राचार्य, विभागातील प्राध्यपक प्रयत्नशील आहे.

**डॉ. सतीश नथूदास वैष्णव**
(विभाग प्रमुख)

## रसायन शास्त्र मंडळ

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे रसायनशास्त्र मंडळाची स्थापना शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांची रसायनशास्त्र या विषयात आवड निर्माण व्हावी त्यासाठी सदर मंडळा तर्फे विविध तज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान, परीक्षांचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये रसायनशास्त्र मंडळाचे उद्घाटन मा.प्रा.डॉ.व्ही.एस.झोपे, मु.जे.महाविद्यालय, जळगाव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना फिजिकल केमेस्ट्री या विषयावर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. दिनांक २८/०२/२०१९ रोजी रसायनशास्त्र मंडळा आणि विज्ञान मंडळ यांचा संयुक्त विद्यमाने विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. प्रा. एच.एम.बाविस्कर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाविषयी सविस्तर माहिती सांगितली व विविध शंकांचे निरसन केले. मा. प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी नोबेल पारितोषिक मिळवलेले भौतिकशास्त्र विषयाचे प्रा.सी.व्ही.रमन यांनी केलेल्या संशोधन कार्याविषयी माहिती दिली. तसेच डॉ.डी.बी.पाटील यांनी आपल्या भाषणात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शोधांचावापर हा शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाला पाहिजे असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेचे अध्यक्ष, चेअरमन, सचिव, सर्व संचालक मंडल, प्राचार्य, विभागातील सर्व प्राध्यापक प्रयत्नशील आहेत.

**डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते**
रसायनशास्त्र मंडळ समन्वयक

---

## विद्यार्थी तक्रार निवारण समिती

या समितीच्या वर्षातून दोन वेळा सभा होतात. जर तक्रार प्राप्त झाली असेल अशावेळी तातडीची सभा बोलवण्यात येते. या वर्षी शै. वर्ष सुरु झाल्यानंतर समितीची सभा मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. त्यावेळी विद्यार्थ्यांना ह्या समितीच्या कार्याची माहिती करुन द्यावी तशा सूचना फलकावर लावल्या त्याप्रमाणे समितीच्या कार्याची माहिती नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना कडुन देण्यात आली. त्यानंतर दुसरी सभा मार्च अखेर संपन्न झाली. या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. सरद समिती योग्य तो निर्णय सर्वानुमते घेत असते.

**प्रा.डॉ.पी.आर.महाजन**
चेअरमन तक्रार निवारण समिती

## करिअर मार्गदर्शन अहवाल २०१८-२०१९

महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन केंद्रामार्फत करिअर संबंधी कार्यशाळेचे आयोजन दि. ०७/०२/२०१९ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे समन्वयक प्रा.व्ही.एन. रामटेके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुक मार्गदर्शक मा. तनुजा फेगडे कॉम्प्युटर डिपार्टमेंट आय एम आर, जळगाव यांनी करिअरच्या संधी आणि विकास यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे दुसरे मार्गदर्शक मा. रंजना एस. झान्जोरे KCES's Institute of management & Research,जळगाव यांनी IT FESTA 2019 यासंबंधी मार्गदर्शनक केले. कार्यक्रमाचे तिसरे मार्गदर्शक मा.पी.पी.घोगरे सहायक प्राध्यापक आय.एम.आरा.कॉलेज जळगाव यानी शिक्षणक्षेत्रामध्ये करिअर करता येत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.एस.एन.वैष्णव यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजनाकरिता कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.एस.पी.उमरीवाड, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## इतिहास विभाग अहवाल

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाच्या स्थापने पासून इतिहास विषय सुरु करण्यात आला.

मार्च / एप्रिल २०१८ मध्ये विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेचा महाविद्यालयाचा निकाल पुढील प्रमाणे.

२०१७–१८ या वर्षाचा निकाल पुढील प्रमाणे –

**द्वितीय वर्ष कला –**

प्रथम – भोई वैशाली सोमा – ७.६३

**तृतीय वर्ष कला –**

प्रथम – गजरे पवन सुनिल – ८.३८

द्वितीय – जंगले रोहिणी यशवंत – ८.३०

तृतीय – येवले गायत्री रामभाऊ – ७.२५

ह्या सर्व पास झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रा. के. एल. हिरोळे, प्रा. वंदना राणे व प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी अभिनंदन व कौतुक केले.

**प्रा. के.एल.हिरोळे**
इतिहास विभाग प्रमुख

## शैक्षणिक सहल समिती अहवाल

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विषयाची आवड निर्माण व्हावी म्हणून विशेष विषयाचा वेग वेगळ्या शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात. या वर्षी रसायनशास्त्र विषयाची शैक्षणिक सहल श्री साईराम प्लॉस्टीक रावेर येथे विभाग प्रमुख डॉ. वैष्णव सतिष नथ्थू यांनी आयोजित केली होती. त्यांना प्रा.एस.आर.इंगळे प्रा.डॉ. जयंत नेहेते डॉ. दिपक पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना आपली संस्कृती, परंपरा, रुढी समजण्यासाठी विविध शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते.

मराठी विभागाची शैक्षणिक सहल आशिरगड येथे गेली होती. तेथील सांस्कृतिक वारसा प्रा.एम.के. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना समजवून सांगितला. सहलीचे आयोजन प्रा.एम.के. सोनवणे व प्रा.डॉ.सौ. रेखा पाटील यांनी केले होते.

अर्थशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल शेगाव येथे गेली होती. याचे आयोजन प्रा.व्ही.एच. पाटील व प्रा.डॉ. नीता वाणी यांनी केले होते.

**प्रा.एम.के.सोनवणे**
चेअरमन
शै. सहल समिती

---

## माजी विद्यार्थी समिती

स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे माजी विद्यार्थी समितीद्वारा १५ ऑक्टोबर २०१८रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार माजी विद्यार्थी मेळावा हा दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ रोजी आयोजित करण्याचे ठरले. सदर कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थ्यांना दुरध्वनी व ई–मेल द्वारे कळविण्यात आले. सदर मेळावा हा दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने हे होते. तसेच प्रा.नितीन बारी, प्रा.एस.आर.इंगळे, प्रा. दिलीप सोनवणे, प्रा. के.एल.हेरोळे, प्रा. एच.एम.बावीस्कर हे उपस्थित होते. यावेळी एकुण २२ माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी व महाविद्यालय यांचा ऋणानुबंध कायमस्वरुपी असावा असे या मेळाव्यातून दिसून आले. सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. डॉ. डी. बी. पाटील**
समन्वयक
माजी विद्यार्थी समिती

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परिक्षां बद्दल आवड निर्माण व्हावी आणि विविध स्पर्धा परिक्षांना सामोरे जाता यावे यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर केंद्रातर्फे विविध विषयातील तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

स्पर्धा परिक्षांची पूर्व तयारी या विषयावर दि. २४/०९/२०१८ रोजी प्रा.सुनिल देशमुख संचालक द युनिक ॲकॅदमी जळगाव, यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शन पर व्याखाना मध्ये स्पर्धा परीक्षांमार्फत भरली जाणारी पदे, परीक्षेचे स्वरुप व पूर्वतयारी यावर विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच मुलाखतीच्या वेळेस कोणकोणत्या गोष्टी महत्वाच्या असतात याची माहिती दिली. श्री. संजय चौधरी, शार्यनिंग स्टार्स ॲकदमी, रावेर यांनी तलाठी आणि पोलीस भरती पूर्व परीक्षा या विषयावर दिनांक २४/०१/२०१९ रोजी मार्गदर्शन केले.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबद्दल जागृती निर्माण व्हावी त्यात ते यशस्वी व्हावेत यासाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा.अध्यक्ष मा.चेअरमन मा.सचिव, सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे मा.प्राचार्य तसेच प्राध्यापक वृंद प्रयत्नशील आहे.

**डॉ. सतीश एन. वैष्णव**
समन्वयक

---

## अविष्कार

स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८–१९ यामध्ये जिल्हास्तरीय अविष्कार यासाठी द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थी राजेश रमेश पाटील व विक्रम किशोर पाटील यांनी 'सत्र परिक्षेचे वेळापत्रक' या विषयावर पोस्टर सादरीकरण केले.

**प्रा. डॉ. डी. बी. पाटील**
समन्वयक

# पारितोषिक वितरण समिती

महाविद्यालयात ग्रामीण भागातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच त्यांना प्रोतसाहित करण्यासाठी प्रत्येक वर्षी पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन केले जाते. महाविद्यालयास ज्या शिक्षणप्रेमी व दानशूर व्यक्तिनी बक्षीसासाठी देणगी दिलेली आहे. ती सर्व एकत्रित रक्कम सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा निंभोरा येथे ठेवीच्या रुपात ठवून त्या रकमेवर येणारे व्याज विभागून विद्यार्थ्यांना बक्षिसांच्या रुपात दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये वार्षिक बक्षिस वितरण सोहळ्याचे आयोजन दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. भागवतभाऊ पाटील उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयात कला व विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष वर्गातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाप्राप्त विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष मा. भागवत पाटील, चेअरमन मा. श्रीराम पाटील, सचिव मा.संजय पाटील,संचालक पाटील, श्री. आर.एन.महाजन, श्री.पी.आर.चौधरी, श्री. पांडुरंग पाटील, प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, उमवि व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.एन.यु.बारी, सिनेट सदस्य डॉ. के.जी.कोल्हे यांच्या हस्ते रोख बक्षिसे देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.एस.आर.इंगळे व प्रा.व्ही.एच.पाटील यांनी केले. तर आभार डॉ. एस.एन.वैष्णव यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रा. एस.आर. इंगळे**
पारितोषिक वितरण समिती
चेअरमन

## समान - संधी केंद्र

समान संधी केंद्रा मार्फत विविध कार्यशाळेचे व्याख्यानाचे स्पर्धाचे वर्षभरात आयोजन करण्यात येते. विविध तंज्ञ मार्गदर्शक वक्त्यांचे लिंग समता स्पर्धा परिक्षेतील यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. परीक्षेतील स्पर्धतील संधी या विषयावर तसेच महिलांचे अधिकार व त्यांचे विविध समस्या या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

त्याचबरोबर बेटी बचाओ बेटी पढाओ, मतदान जनजागृती, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा त्याच बरोबर सायबर क्राईम, रॅगिंग विषयी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रा. एस.पी. उमरीवाड**
चेअरमन

---

## AISHE
## All India Survey on Higher Education
## MHRD New Delhi

महाविद्यालयाची या शैक्षणिक वर्षाची ३० सप्टेंबर २०१८पर्यंतची सर्व विभागांची माहिती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, मागील शैक्षणिक वर्षाचा निकाल, शिष्यवृत्ती इत्यादी माहिती दरवर्षी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने व सिनिअर क्लार्क श्री.पी.व्ही. महाजन यांचे मदतीने महाविद्यालयाचे Nodal Officer प्रा.एस.बी. महाजन भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाकडे पाठवितात. हा रिपोर्ट दरवर्षी पाठविणे बंधनकारक आहे. तसेच AISHE रिपोर्टचा संदर्भ महाविद्यालयाचे NAAC तर्फे मुल्यांकन करण्यासाठी होतो.

भारतातील विद्यापीठे, महाविद्यालये यांची माहिती राज्यनिहाय गोळा केली जाते. यासाठी दरवर्षी कार्यशाळा आयोजीत केलेली असते. कार्यशाळेत मिळालेल्या माहितीच्या आधारे रिपोर्ट तयार केला जातो.

**प्रा. एस.बी. महाजन**
Nodal Officer

---

# राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक विद्यार्थ्यांन मध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांनी राष्ट्र उभारणीत आणि राष्ट्र विकासात निरपेक्ष वृत्तीने सहभागी होण्यासाठ प्रयत्नशील आहे. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत नियमित कार्यक्रमासाठी १४० व विशेष हिवाळी शिबिरात ६४ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

महाराष्ट्र शासन आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या परीपत्राकान्वये नेमून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रासेयो एकक राबवते. नियमित कार्यक्रमा मध्ये जागतिक योग दिवस, आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिवस, आंतर राष्ट्रीय साक्षरता दिवस, सद्‌भावना दिवस, स्वतंत्रता दिवस, आंतर राष्ट्रीय लोकसंख्या दिवस, आंतर राष्ट्रीय शांतता दिवस, रासेयो स्थापना दिवस, राष्ट्रीय युवक दिवस, विद्यार्थी दिवस, शहीद दिन, सर्जिकल स्ट्राईक दिवस, राष्ट्रीय रक्तदान दिवस, अहिंसा दिवस, एकता दिवस, संविधान दिवस, जागतिक महिला दिवस, राष्ट्र पुरुषांची जयंती व पुण्यतिथी असे विविध कार्यक्रम आयोजित निमित्ताने ०१/०७/२०१८ पासून १०/०७// २०१८ या कालावधीत महाविद्यालाय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. स्वच्छता अभियान : १०० तास स्वच्छतेसाठी या उपक्रम अंतर्गत स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर तसेच दत्तक वस्ती धामोडी येथे स्वच्छतेसाठी या उपक्रम अंतर्गत स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर तसेच दत्तक वस्ती धामोडी येथे स्वच्छता अभियान राबविले. त्यात प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थी आणि ग्रामस्थासाठी पोस्टर प्रदर्शना द्वारे जनजागृती केली. दिनांक १/०८/२०१८ ते १५/०८/२०१८ दरम्यान स्वच्छता पंधरवाडा साजरा करण्यात आला. त्याअंतर्गत महाविद्यालयात, ऐनपूर गावात आणि दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथे स्वच्छता अभियान राबविले व जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे एकदिवशीय शिबीर दिनांक १३/१०/२०१८ रोजी दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथील जि.प.मराठी शाळेत संपन्न झाले. सदर शिबिरात उपप्राचार्य डॉ. पी.आर. महाजन आणि प्रा. एस.डी. धापसे यांचे मार्गदर्शन लाभले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दिनांक २२/१२/१८ ते २८/१२/१८ या कालावधीत दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथील जि.प.मराठी शाळेत संपन्न झाले. सदर शिबिराच्या निमित्ताने एक पाऊल डिजिटल साक्षरतेकडे, सौर उर्जेचा वापर, ग्रामविकासात युवकांची भूमिका, रक्तदान–श्रेष्ठदान, आपत्ती व्यवस्थापन, अवयवदान, सोसीअल मेडिया चा समाजावर होणारा परिणाम, अंधश्रध्दा निर्मुलन जातिमुक्त समृध्द भारत, पर्यावरण संवर्धन, बेटी बचाव बेटी पढाव, राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदा, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन अशा विविध विषयावर तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. तसेच रासेयो स्वयंसेवकांनी शाळेच परिसर, रस्ते, विठ्ठल मंदिर परिसर अशा विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. जि.प. शाळेच्या खोलाच्या मागे वाढलेले गवत व झुडपे उपटून काढली. माध्यमिक विद्यालयाची मुतारी आणि अंगणवाडीच्या सांडपाण्याची व्यवस्था करुन शोष खड्डा तयार करुन दिला. श्रमदाना मध्ये धामोडी गावातून अंगणवाडी कडे येणारा रस्ता तयार केला. जि.प.मराठी शाळेच्या आवारात घन कचरा व्यवस्थापनासाठी कंपोस्ट खड्डा तयार करुन जमा झालेला कचरा,कंपोस्ट खड्डात टाकून त्याची विल्हेवाट लावली. धामोडी गावात जनगागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यात व्यसनमुक्ती विषयावर पथनाट्य सादरीकरण झाले. रासेयो स्वयंसेवक, नितीन महाजन, विठ्ठल पाटील, गोपाल कोळी यांनी परिश्रम घेतले.

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहेते यांनी दिनांक २३/०२/२०१९ ते २४/०२/२०१९ या कालावधीत शिव छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय कार्यशाळा २०१९ 'सक्षम युवा समर्थ भारत अभियान' यात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या

सर्व कार्यक्रमाचे आयोजन मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, जिल्हा व विभागीय समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.सतिश वैष्णव, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहते, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. निता वाणी आणि स्वयंसेवक यांनी केले. या शैक्षणिक वर्षातील सर्व कार्यक्रमांसाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, चेअरमन, सचिव आणि संचालक यांचे मार्गदर्शन आणि उपस्थिती लाभली.

**डॉ. सतीश एन.वैष्णव**
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी

## संगणकशास्त्र विभाग

महाविद्यालयात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष स्तरावर संगणकशास्त्र हा विषय जुन २००८ पासून सुरु करण्यात आला आहे.

चालू शैक्षणिक वर्षात संगणकशास्त्र विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा. रुपाली चंद्रकांत बऱ्हाटे  २) प्रा. मोहिनी कैलास बऱ्हाटे

सदर विभागात प्रा. एस.बी. महाजन समन्वयक म्हणून कार्यरत आहेत व प्रा.एच.एम. बाविस्कर विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

विभागाचा २०१६–१७ वर्षांचा निकाल खालीलप्रमाणे :–

प्रथम वर्ष विज्ञान (संगणक शास्त्र) – १) अंकीता रमेश चौधरी (प्रथम क्रमांक)
२) अपूर्वा विजय महाजन (द्वितीय क्रमांक)

द्वितीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र) – १) हेमलता संजय चौधरी (प्रथम क्रमांक)
२) श्रध्दा विठ्ठल पाटील (द्वितीय क्रमांक)

तृतीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र) – १) प्रेरणा रमेश चौधरी (प्रथम क्रमांक)
२) ज्ञानेश्वर हरेश्वर चौधरी (द्वितीय क्रमांक)
३) अजय रमेश पाटील (तृतीय क्रमांक)

**प्रा. एच.एम. बाविस्कर**
विभाग प्रमुख

**प्रा. एस.बी. महाजन**
समन्वयक

## परीक्षा तक्रार निवारण समिती

सदर समिती मार्फत महाविद्यालयात घेण्यात येत असलेल्या अंतर्गत परीक्षा सदंर्भात काही तक्रार असल्यास ती तक्रार त्वरीत विनाविलंब निकाली काढून विद्यार्थ्याचे समाधान करण्यात येते. समितीची सभा अंतर्गत परिक्षा संपल्यानंतर व गुणयाद्या प्रसिध्द झाल्यानंतर घेण्यात येत असते. कोणत्या विद्यार्थ्यास कमी गुण पडले किंवा कोणाची ती परीक्षा देणे बाकी आहे त्यासंदर्भातील तक्रार सोडवण्याचे काम कमिटी मार्फत करण्यात येते. या शैक्षणिक वर्षा मध्ये कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार समितीस प्राप्त झालेली नाही.

**प्रा. डॉ. पी.आर.महाजन**
परीक्षा तक्रार निवारण समिती

## पर्यावरण अभ्यास मंडळ शैक्षणिक वर्ष २०१८-१९

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अभ्यासक्रमा नुसार महाविद्यालयात प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गासाठी पर्यावरण हा विषय सक्तीचा करण्यात आलेला आहे. पर्यावरण संतुलनासाठी महाविद्यालयात दरवर्षी वृक्षारोपण केले जाते. पर्यावरणाबद्दल संपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरण अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांकडून पर्यावरणावर आधारित लघुप्रकल्प तयार करण्यात येतात. लघुप्रकल्प तयार करत असतांना महाविद्यालय परिसरातील वेगवेगळ्या वनस्पतींचा ही अभ्यास करतात.

**प्रा. आर. व्ही. भोळे**

समन्वयक

---

## मराठी वाङ्मय मंडळ

मराठी वाङ्मय मंडळामार्फत दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिक अभिरुची निर्माण व्हावी. विद्यार्थ्यांजवळील शब्दसंपत्ती वाढावी, कल्पनाशक्तीचा विकास व्हावा, या उद्देशाने मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली.

मराठी वाङ्मयमंडळाची स्थापना गुरुपौर्णिमाचे औचित्य साधून करण्यात आली. मा. उपप्राचार्य डॉ.पी.आर. महाजन यांनी गुरुची महती आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितली. सुप्रसिध्द बालकवी आणि माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. १४ ऑक्टोबर २०१७ रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. ३ जानेवारी २०१८ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. २७ फेब्रुवारी २०१८ रोजी कवि कुसुमाग्रज जयंती ( वि.वा.शिरवाडकर) व मराठी भाषा दिवस उपप्राचार्य प्रा.डॉ.निता वाणी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. मराठी व्याकरणावर आधारित प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात आली.

विविध काय्रक्रमांच्या यशस्वीतेसाठी मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, उपप्राचार्य प्रा.डॉ.पी.आर.महाजन, उपप्राचार्य डॉ. निता वाणी यांचे मार्गदर्शन लाभले मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.रेखा प्रमोद पाटील, प्रा.महेंद्र सोनवणे, प्रा.दिलीप सोनवणे यांच्या परिश्रमाने विविध उपक्रम यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक प्राचार्य, उपप्राचार्य, मराठी वाङ्मय मंडळाच्या अध्यक्ष, सदस्य व प्राध्यापक वृद यांनी केले.

**प्रा.डॉ. रेखा पी. पाटील**

समन्वयक

# मराठी विभाग अहवाल

ऐनपूर परिसरातील कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात १९९४–९५ या शैक्षणिक वर्षापासून पदवी मराठी हा विषय विशेष स्तरावर सुरु करण्यात आला. याचप्रमाणे २०११–१२ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर स्तरावर विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यात आला. सदर विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा.डॉ. रेखा प्रमोद पाटील – विभाग प्रमुख

२) प्रा.एम.के.सोनवणे – समन्वयक, पदव्युत्तर विभाग

३) प्रा. दिलीप सोनवणे

शै. वर्ष २०१८–१९ मध्ये द्वितीय वर्ष कला शाखेतील मराठी विशेष स्तराच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक–सांस्कृतिक सहल आशिरगड येथे संपन्न झाली. या ऐतिहासिक स्थळाची सांस्कृतिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या सहलीचे आयोजन प्रा.डॉ.रेखा पाटील आणि प्रा.एम.के.सोनवणे यांनी केले.

सदर शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना वाङ्मय प्रकार नाटकाचे अध्यापन प्रभावी व्हावे यादृष्टीने 'प्रेमाच्या गावा जावे' वसंत कनेटकर या नाटकाची चित्रफीत दि. ०६/०३/२०१९ रोजी बुधवारी दाखविण्यात आली.

मराठी विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०१७–१८ चा निकाल समाधानकारक आहे. या वर्षातील गुणवत्ताधारक विद्यार्थी पुढील प्रमाणे होत.

प्रथम वर्ष कला –

मराठी विषयात प्रथम क्रमांक – पाटील शुभांगी शिवाजी

द्वितीय कला मराठी विशेष स्तर

प्रथम क्रमांक – चौधरी भाग्यश्री अनिल (६७.०८%)

द्वितीय क्रमांक – भोई माधुरी रमेश (६६.७५%)

तृतीय क्रमांक – पाटील प्रांजल अनिल

तृतीय वर्ष कला मराठी विशेष स्तर

प्रथम क्रमांक – पाटील काजल रविंद्र (६९.५८%)

द्वितीय क्रमांक – कोळी मनिषा प्रकाश (५९.७५%)

एम.ए.मराठी –

प्रथम क्रमांक – शिंदे प्रिती हिरामण

द्वितीय क्रमांक – पाटील पूजा संतोष

तृतीय क्रमांक – बऱ्हाटे पौर्णिमा बाळू

सर्व गणवताधारक विद्यार्थ्याना वार्षिक पारितोषिक वितरण समारोह प्रसंगी रोख बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

**प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील**
मराठी विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग
# अहवाल वर्ष २०१८-१९

महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविला जात असून अर्थशास्त्र विभागात प्रा.डॉ.नीता एस.वाणी अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणुन आणि प्रा. विलास एच.पाटील सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. २०१७-१८ चा अर्थशास्त्र विभागाचा शैक्षणिक निकाल पुढीलप्रमाणे लागला

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एस.वाय.बी.ए. :-** | प्रथम क्रमांक | – | चौधरी अश्विनी देवराम | – ७२.०८% |
| | द्वितीय क्रमांक | – | पाटील वैशाली संतोष | – ७०.३३% |
| | तृतीय क्रमांक | – | महाजन रुचिता विकास | – ६६.५०% |
| **टी.वाय.बी.ए. :-** | प्रथम क्रमांक | – | कोळी दुर्गा अशोक | – ७६.३३% |
| | द्वितीय क्रमांक | – | भवरे वैशाली पंढरी | – ७६.१७% |
| | तृतीय क्रमांक | – | तायडे दीक्षा राजेंद्र | – ७५.२५% |

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांचा सर्वागीण विकास व्हावा या उद्देशाने महाविद्यालयात अर्थशास्त्र व नियोजन मंडळाची दरवर्षी स्थापना करुन विविध कार्यक्रम या मंडळातर्फे राबविले जाता. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पुढील कार्यक्रम राबविण्यता आले.

**१) उद्घाटन व व्याख्यान** – महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या शुभहस्ते तसेच व्याख्यान प्रा.व्ही.एच.पाटील आणि प्रा. उमरीवाड दिनांक ११ जुलै २०१८.

**२) शिक्षक दिन** – प्रमुख वक्ते प्रा. हिरोळे के. एल. प्रा. उमरीवाड, दिनांक ५ सप्टेंबर २०१८

**३) वक्तृत्व स्पर्धा –** विषय व्यसनाधीनता ही एक सामाजिक कीड दिनांक ७ फेब्रुवारी २०१९

निकाल – प्रथम क्रमांक – महाजन भावना सुनील
द्वितीय क्रमांक – तायडे लक्ष्मी उमेश्वर
तृतीय क्रमांक – राजपूत शांताराम गोकुळसिंग
उत्तेजनार्थ – प्रजापती शुभम दामोदर, कोळी संजय वसंत

**४) निबंध स्पर्धा** – विषय वस्तू व सेवा कर प्रणाली-चांगले, वाईट परिणाम दिनांक ५ फेब्रुवारी २०१९

निकाल – प्रथम क्रमांक – पाटील निकिता नितीन
द्वितीय क्रमांक- पाटील वैष्णवी अशोक
तृतीय क्रमांक – महाजन गायत्री प्रभाकर, उत्तेजनार्थ-कोळी गजानन संतोष

**५) निरोप सभारंभ** – दिनांक १७ मार्च २०१९

**प्रा.डॉ. नीता एस. वाणी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

## विज्ञान मंडळ अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ यात सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये विज्ञान मंडळाची स्थापना करण्यात आली विज्ञान मंडळामार्फत रबर उत्पादन व प्रक्रिया जैविक इंधन निर्मिती इ. विषयाचे एलसीडी प्रोजेक्टर मार्फत प्रा.एस.बी.पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच डॉ.के.जी.कोल्हे, डॉ.एस.ए.पाटील, डॉ.जे.पी.नेहेते, डॉ.डी.बी.पाटील यांनी विविध विषयांवर एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून सादरीकरण केले. तसेच दि. २८/०२/२०१९ रोजी महाविद्यालयात विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते. डॉ.जे.बी.अंजने यांनी विज्ञानाची प्रगती तसेच डॉ.डी.बी.पाटील प्रा.हेमंत बाविस्कर यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.एस.एन.वैष्णव तर आभार प्रदर्शन डॉ.जे.पी.नेहते यांनी केले सर्व कार्यक्रमाच्या सुत्रसंचलन डॉ.एस.एन.वैष्णव तर आभार प्रदर्शन डॉ.जे.पी.नेहते यांनी केले सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा.डॉ.पी.आर.महाजन, डॉ.के.जी.कोल्हे प्रा.एस.बी.पाटील. डॉ.एस.ए.पाटील, डॉ.एस.एन.वैष्णव तर आभार प्रदर्शन डॉ.जे.पी.नेहते यांनी केले सर्व कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य प्रा.डॉ.पी.आर.महाजन, डॉ.के.जी.कोल्हे प्रा.एस.बी.पाटील, डॉ.एस.ए.पाटील, डॉ.एस.एन.वैष्णव, डॉ. जयंत नेहेते, प्रा.एस.बी.महाजन, प्रा.एस.आर.इंगळे, यांनी परिश्रम घेतले.

**प्रा. हेमंत बाविस्कर**
चेअरमन

---

## युवती सभा

महाविद्यालयात विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे वर्ष २०१८–१९ साठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यींनीसाठी स्वतंत्र व्यासपीठ मिळावे, त्यांच्या समस्यांची सोडवणूक करता यावी या उद्देशाने दरवर्षी युवती सभेची स्थापना केली जाऊन विविध कार्यक्रम राबविले जाते. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये युवती सभेद्वारे पुढील कार्यक्रम राबविण्यात आले.

१) युवती सभेची स्थापना व उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या शुभहस्ते दि. २०/०८/२०१८
२) गीत गायन स्पर्धा – दि. २८/०८/२०१८
निकाल – संघिक गट – प्रथम क्रमांक – चौधरी कांचन, चौधरी अश्विनी
द्वितीय क्रमाकं – महाजन अपूर्वा, चौधरी अंकिता
वैयक्तिक गट – प्रथम क्रमांक – पाटील सुषमा
द्वितीय क्रमांक – पाटील शुभांगी
तृतीय क्रमांक – काटे हर्षदा आणि जाधव दिपाली (विभागून)
३) सारी डे व व्याख्यान – व्याख्याते – डॉ.रेखा पाटील विषय–शिक्षण आणि स्त्रिया
४) उ.म.वि. जळगाव आणि स.व.प. कला व विज्ञान ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा दि. १७/०९/२०१८
५) उ.म.वि. जळगाव आणि स.व.प. कला व विज्ञान ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनीसाठी जुडो कराटे शिबीर दि. ३ ऑक्टोबर २०१८ ते ११ ऑक्टोबर २०१८
६) परिसंवाद विषय मुले व मुली वयात येताना दि. ११ ऑक्टोबर २०१८
७) चर्चासत्र विषय महिला सबलीकरण वास्तव व व्यया दि. १२ ऑक्टोबर २०१८
८) चर्चासत्र विषय महिला सबलीकरण काळची गरज दि. १३ ऑक्योबर २०१८
९) चर्चासत्र विषय स्त्री शक्तीचा जागर दि. १५ ऑक्टोबर २०१८
१०) जागतिक मिहला दिन दि. ८ मार्च २०१९

**डॉ. निता एन. एस. वाणी**
युवती सभा

# गणित विभाग

विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना एखादे उदाहरण कमीत कमी वेळेत सोडवावयाचे असल्यास गणितीय दृष्टीकोन असणे आवश्यक असतो. हा विचार लक्षात ठेवून विद्यार्थांच्या ज्ञानाच्या कक्षा उंचावण्यासाठी व गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी महाविद्यालयात कर्यतरत असलेले गणित विषयाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. एस.बी.महाजन दरवर्षी Mathematics Intelligence Testया १०० गुणांच्या परिक्षेचे आयोजन करतात. या वर्षी दिनांक १०/०८/२०१८ रोजी या परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परिक्षेचा फायदा S.Y B.A / B.Sc., G.K.Exam. तसेच MCA, IAS, IPS, IFS, MBA अश्या अनेक कोर्सेसच्या पात्रता परिक्षांना होतो.

परिक्षेत यश प्राप्त विद्यार्थी खालील प्रमाणे

| | | | Marks Obtained Out of 100 |
|---|---|---|---|
| F.Y.B.Sc. | First Second | Patil Vaishnavi Gopal | 74 |
| | | Mahajan Tejal Pandit | 66 |
| S.Y.B.Sc. | First Second | Bari Ketan Digambr | 76+ |
| | | Kaldate Ashitosh Prabhakar | 76 |
| T.Y.B.Sc. | First | Chaudhari Ankita Ramesh | 86 |

परिक्षेत प्राविण्यप्राप्त विद्यार्थीना प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

**Mr. S.B.Mahajan**
Head Department of Mathematics

# ओ.बी.सी.सेल अहवाल

या शैक्षणिक वर्षामध्ये मा. प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली डॉ.पी.आर महाजन, डॉ.एस्.ए.पाटील, डॉ.जे.पी.नेहेते व श्री. जी.एन्.पाटील यांची समिती गठीत करण्यात येवून समिती मार्फत ओबीसी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असलेल्या विविध शिष्यवृत्ती संदर्भात त्यात राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, भारत सरकार शिष्यवृत्ती, आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती, खुली शिष्यवृत्ती, एच.पी.सी. एल शिष्यवृत्ती, प्रा.बी.ए.पाटील शिष्यवृत्ती इ. ची माहिती विद्यार्थ्याना देण्यात येवून सदर विद्यार्थ्यास मदत करण्यात येते.

**प्रा. डॉ. पी.आर.महाजन**
सचिव ओ.बी.सी.सेल.

## परीक्षा समिती

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अभ्यासक्रमानुसार मुल्यमापनासाठी महाविद्यालयात प्रथम व द्वितीय सत्रा मध्ये अंतर्गत परीक्षांचे आयोजन करण्यात आले. प्रथम सत्रात २३ ऑगस्ट २०१८ ते २५ ऑगस्ट २०१८ व २४ सप्टेंबर २०१८ ते २६ सप्टेंबर २०१८ या कालावधीत कला व विज्ञान शाखेतील सर्व वर्गाच्या अंतर्गत परिक्षा आयोजित करण्यात आल्या. तसेच द्वितीय सत्रामध्ये २८ जानेवारी २०१९ ते ३० जानेवारी २०१९ व २० फेब्रुवारी २०१९ ते २२ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत परीक्षेचे आयोजन करण्यात आले महाविद्यालयीन अंतर्गत परिक्षा सुरळित पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षा समितीचे चेअरमन प्रा.एस.आर.इंगळे, समिती सदस्य डॉ.आर.व्ही.भोळे, डॉ.एस.ए.पाटील यांनी सहकार्य केले.

**प्रा. एस.आर. इंगळे**
समन्वयक

---

## ''ज्ञानगंगोत्री हस्तलिखित''

महाविद्यालयीन आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालयातील सर्व मंडळे व विविध समित्यांमार्फत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सदर ज्ञानगंगोत्री हस्तलिखित मंडळ, सुक्ष्म लेखन कौशल्याला पुढे आणून लिखाणासाठी एक हक्काचे मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधील विविध विषया वरील लेख अथवा कविता आणून समितीतील प्राध्यापकांकडून तपासून घेतात, त्यावर योग्य मार्गदर्शन करुन सुधारणा करतात. सुधारणा झाल्या नंतर ते साहित्य भित्ती फलकावर लावण्यात येते.

ज्ञानगंगोत्री या हस्तलिखितांचे उद्‌घाटन या चालु शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मा. प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी समितीतील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. दर पंधरा दिवसांनी या भित्ती पत्रकावरील हस्तलिखित साहित्य बदलविण्यात येते. या उपक्रमाच्या यशास्वितेसाठी प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.डॉ.रेखा पाटील व प्रा.एन.यु.बारी, प्रा.डॉ. पी.आर.गवळी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले

**प्रा. डॉ. पी. आर. गवळी**
समन्वयक

# व्यसनमुक्ती युवा मंच अहवाल

महाविद्यालयीन युवकांचा शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त उपक्रमातील सहभाग वाढावा, युवकांचे आरोग्य सुदृढ होवून ते देशाचे भावी निरोगी  नागरीक तयार व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात व्यसनमुक्ती युवा मंचाची स्थापना करण्यात येते या मंचाचे उपक्रम योग्य रितीने चालावे म्हणून विद्यार्थी व प्राध्यापक मिळून मंडळ स्थापन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने अध्यक्ष तर प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे सचिव म्हणून काम पाहिले.

महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ मोठ्या अक्षरामध्ये नियमांचा बोर्ड तयार केला असुन त्यात गुटखा बंदीच्या सुचना दिलेल्या आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये नशा होणाऱ्या पदार्थाचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी गुटखा बंदीची मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.  यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून खिशातील गुटखा पुड्या जमा करुन महाविद्यालयाच्या प्रांगणात होळी करण्यात आली.  विद्यार्थ्यांकडून आजपासून पुढे गुटखा, नशीले पदार्थ खाणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली. यावेळी महाविद्यालयातील युवा मंचाचे सदस्य उपस्थीत होते.

राष्ट्र निकोप राहण्यासाठी व्यसनमुक्त युवकांची गरज या विषयांवर प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांचे मार्गदर्शन पर व्याख्यान झाले. वेळोवेळी शासन विद्यापीठाद्वारे व्यसनमुक्ती बाबतचे उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येतात. व्यसनमुक्ती युवा मंच अंतर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली मंचाचे सदस्य प्रा. डॉ. एस. ए. पाटील, प्रा. व्ही. एच. पाटील व प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी सहकार्य केले.

**डॉ. आर.व्ही. भोळे**
समन्वयक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळाप्रवेश हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा २०१८-१९

महाविद्यालयात शासनाच्या परिपत्रकानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळाप्रवेश हा विद्यार्थी दिवस म्हणून दि. ०७/११/२०१८ रोजी साजरा करण्यात आला. विद्यार्थी दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थी जीवना विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रजापती या विद्यार्थ्याने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, डॉ.रेखा पाटील, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. वंदना राणे यांनी केले.

**प्रा.व्ही.एन. रामटेके**

समन्वयक

---

# रॅगींग प्रतिबंध समिती

सदर समितीमार्फत वर्षभरामध्ये किमान दोन सभा घेण्यात येतात. परंतु रॅगिंग संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास तातडीने सभा बोलवण्यात येते. वर्षाच्या सुरवातीस सदर सभेमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना रॅगिंग बदलचे तोटे व होणारे शै. नुकसान या बद्दलची माहिती विद्यार्थ्यास करुन द्यावी असे ठरले. रॅगींग संदर्भातील काही मिळालेली पत्र हे सुध्दा दर्शनी भागामध्ये लावण्यात आली. गरजेनुसार एखादा वक्ता किंवा पोलिस उपनिरीक्षक बोलवून माहिति दाखवून द्यावी असे ठरले. परंतु या वर्षामध्ये घेतलेली ही रॅगींग संदर्भात तक्रार समितीस प्राप्त झाली नाही.

**प्रा. पी.आर. महाजन**

चेअरमन रॅगींग प्रतिबंध समिती

# मानसशास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

महाविद्यालयात मानसशास्त्र विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळाप्रवेश हा विद्यार्थी दिवस म्हणून दि. ७/११/२०१८ रोजी साजरा करण्यात आला. विद्यार्थी दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विषयावर मानसशास्त्रचे विभाग प्रमुख प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थी जीवन कसे जगले असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचानल निकिता बारी या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा. व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पी.आर.गवळी यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

महाविद्यालयात मानसशास्त्र विभागातर्फे मानवी हक्क दिन दि. १०/१२/२०१८ रोजी साजरा करण्यात आला. मानसशास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन.रामटेके विद्यार्थी समुपदेशन केंद्र व चाचणी केंद्र मानसशास्त्र विभाग सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्काचे तत्व संविधानाच्या कलम १४ ते कलम ३२ पर्यंत समावेश असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्काच्या जाहिरनाम्या विषयी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता बारी या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.कु.दिपाली जाधव यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

ऐनपूर येथील स.व.प. महाविद्यालयात मानसशास्त्र विभागा मार्फत ३ जानेवारी २०१९ रोजी सावित्रीबाई फुले जयंती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य जे.बी.अंजने होते तर प्रमुख वक्ते प्रा.डॉ.सौ.रेखा पाटील होत्या. त्यांनी सावित्रीबाईच्या जीवनातील समस्या व जीवन कार्याची महती सांगितली. तसेच प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी सावित्रीबाई यांची महिला शिक्षण कार्याबद्दल माहिती सांगितली. तसेच प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल बोलताना म्हटले की. स्त्री, शुद्र आणि बहुजनातील अज्ञान व अंधश्रध्दशिक्षणाच्या अस्त्राने दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखन कार्याचा व जीवन कार्याचा आढावा घेतला. आणि कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी फुले दांपत्याने स्त्रीशिक्षण, शेतकरी आणि शुद्रातिशुद्र यांना ज्ञानाच्या माध्यमाने जागृत करण्याचे कसे प्रयत्न केले आणि समाज जागृत करण्यासाठी समाजिक विटम्बनेचा त्रास सहन केला. आजच्या आधुनिक काळातील स्त्री विकासाचा पाया रोवला गेला आणि आधुनिक काळातील स्त्री सशक्त बनली असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. दिपाली जाधव ह्या विद्यार्थिनीने केले. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.पी.आर.गवळी यांनी केले. कार्याक्रमाचे आयोजन मानसशास्त्र विभागामार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.डी.एस.सोनवणे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.एस.पी.उमरीवाड सहकार्य केले.

**प्रा.व्ही.एन. रामटेके**
(मानसशास्त्र विभाग प्रमुख)

# मतदान जनजागृती अभियान

सरदार वल्लाभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जे.बी. अंजने हे होते. प्रमुख पाहुणे श्रीमती कविता देशमुख, नायब तहसिलदार रावेर, श्री. संजय राठोड, श्री. निलेश राठोड हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी या प्रा. हेमंत बाविस्कर, नोडल ऑफीसर मतदान जनजागृती अभियान, प्रा.डॉ.पी.आर.महाजन डॉ. एस.एन.वैष्णव, डॉ. जयंत नेहते, डॉ.के.जी.कोल्हे, डॉ. एस.ए.पाटील, प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मतदान नोंदणीचे आवाहन करण्यात आले.

तसेच महाविद्यालयात वोटर अवेरनेस फोरमची स्थापना करण्यात आली

| | |
|---|---|
| प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने | अध्यक्ष |
| प्रा. हेमंत बाविस्कर | नोडल ऑफिसर |
| प्रा.एस.पी.उमरीवाड | सहाय्यक नोडल ऑफिसर |
| किरण कोळी | कॅम्पस ॲम्बेसेटर– विद्यार्थी प्रतिनिधी |
| कु. अंकिता चौधरी | कॅम्पस ॲम्बेसेटर–विद्यार्थीनी प्रतिनिधी |

महाविद्यालयामध्ये मतदान जनजागृती निमित्ताने रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा तसेच निंबध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

दि. २५/०१/२०१९ रोजी मतदान दिवसानिमित्ताने शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.जे.बी.अंजने हे होते. प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी शपथ दिली सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य डॉ.पी.आर.महाजन, डॉ.निता वाणी, डॉ.एस.एन.वैष्णव, डॉ. जयंत नेहेते, डॉ.के.जी.कोल्हे, डॉ.एस.ए.पाटील, प्रा.व्ही.एच.पाटील यांनी मेहनत घेतली.

तसेच दि. ०७/०३/२०१९ रोजी व्हीव्हीपॅट मशीन जनजागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.जे.बी.अंजने हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन तहसिलदार उषाराणी देवगुणे ह्या होत्या, सदर कार्यक्रमात तहसिलदार उषाराणी देवगुणे यांनी व्हीव्हीपॅट मशीनची पूर्ण माहिती दिली.

**प्रा. एस.पी.उमरीवाड**
सहाय्यक नोडल ऑफिसर

**प्रा. हेमंत बाविस्कर**
नोडल ऑफिसर
मतदान जनजागृती अभियान

# व्यसनमुक्ती जनजागृती व प्रबोधन अभियान

रावेर तालुक्यातील ऐनपूर हे गाव अर्थिक दृष्ट्या सधन, आधुनिक विचाराचे, शैक्षणिक प्रगती साधलेले सर्व धर्म सम भाव जोपासणारे पण या गावातील व्यसनाधीनता वाढल्यामुळे महिलांना व त्यांच्या कुटुंबियांना त्रास होत होता. तो दूर करण्यासाठी सर्वच महिला एकत्रित आल्या आणि त्यांनी ऐनपूर गावातील दारु बंद करुन अनेकांचे संसार सुखाचे केले. महिलांनी हे कार्य कोणत्याही अमिषाला, राजकीय हेतूला बळी न पडता केले. सधन कुटूंबातील महिलाही या महिलांच्या मदतीला धावून गेल्या. ऐनपूर गावातील दारु आता पूर्णपणे बंद झालेली आहे. या महान सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार स.व.प.कला व विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आला होता. या कार्यात मुख्य भूमिका निभावणाऱ्या महिलांचा सत्कार महाविद्यालयाने केला. प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन श्री. श्रीराम नारायण पाटील यांनी भूषविले. दारुबंदी महिला कार्यकत्यांमधील रमाबाई बहुउद्देशीय महिला मंडळाच्या सदस्या अलकाताई चौधरी यांनी आपल्या मनोगतात त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व महिला आणि ग्रामस्थांचे आभार मानले. तसेच दारु बरोबर गावातील गुटखा, तंबाखू बंद होणे आवश्यक आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या मनोगतात ऐनपूर गावातील दारु बंद करण्यात सहभागी असणाऱ्या सर्व महिलांचे अभिनंदन केले. व्यसनाधीनता ही समाजाला लागलेली फार मोठी किड आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक संसार उध्वस्त होत होते ते या महिलांनी सुखी केले आहे. प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. श्रीराम नारायण पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी महिला दुर्गेचे रुप धारण करु शकतात. हे आमच्या ऐनपूरच्या महिलांच्या कार्यातून दिसून येते. त्यांनी दारुबंदीचे कार्य करणाऱ्या महिलांचे कौतुक व अभिनंदन केले. सदर कार्यक्रमास सौ. मीराबाई महाजन, सौ. आशाबाई भालेराव, सौ. बेबाबाई प्रकाश तायडे, सौ.मंदाबाई महाजन, सौ. वैशाली महाजन, सौ. मंगलाबाई राजपूत, शोभाबाई अटकाळे, दुर्गाबाई वाघ, अनुबाई अवसरमल या महिलांसह अनेक महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.भागवत विश्वनाथ पाटील यांच्यासह सर्व संचालक सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचलन उपप्राचार्य डॉ.निता एस.वाणी व आभार डॉ. एस.एन.वैष्णव यांनी केले.

**प्रा. व्ही.एच.पाटील**
विद्यार्थी विकास अधिकारी
**डॉ. एस.एन.वैष्णव**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

## बक्षिसासाठी शिक्षणप्रेमी देणगीदारांची नांवे

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| १) | श्री. नारायण शामू महाजन | १०००=०० |
| २) | कै. गंभीर हरी महाजन | १०००=०० |
| ३) | श्री. प्रकाश राजाराम चौधरी | १०००=०० |
| ४) | कै. विठ्ठल किसन पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. युवराज विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५) | श्री. तुकाराम गरबड पाटील | १०००=०० |
| ६) | श्री. माधव तोताराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रघुनाथ माधव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ७) | श्री. भगवान फकिरा महाजन | १०००=०० |
| ८) | श्री. सुरेशचंद्र नंदलाल जैस्वाल | १०००=०० |
| ९) | कै. दत्तु किसन पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. सुनिल भगवान पाटील यांचेकडून | १०००=०० |
| १०) | श्री. दत्तु सोनजी पाटील | १०००=०० |
| ११) | श्री. गणेश जिवराम महाजन | १०००=०० |
| १२) | कै. एकनाथ रघुनाथ पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. सुदेश एकनाथ पाटील यांचेकडून | १०००=०० |
| १३) | कै. डिगंबर राजाराम पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रमेश डिगंबर पाटील (निंबोल) यांचेकडून | २०००=०० |
| १४) | कै. जगन्नाथ राजाराम पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विजय जगन्नाथ पाटील (निंबोल) यांचेकडून | १०००=०० |
| १५) | कै. बाजीराव रामू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. मोहन बाजीराव पाटील यांचेकडून | ५००=०० |
| १६) | श्री. श्रीराम तुकाराम महाजन | ५००=०० |
| १७) | कै. लक्ष्मण शामजी महाजन यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. वसंत लक्ष्मण महाजन (चिनावल) यांचेकडून | १०००=०० |
| १८) | श्री. श्रीराम नारायण पाटील | १०००=०० |
| १९) | कै. पुना गणू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. प्रल्हाद मधुकर पाटील यांचेकडून | १०००=०० |
| २०) | श्री. दत्तात्रय तुकाराम महाजन | १०००=०० |
| २१) | कै. रघुनाथ शामू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गणेश रघुनाथ पाटील यांचेकडून | १५००=०० |
| २२) | कै. बाजीराव किसन पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. पांडूरंग बाजीराव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| २३) | श्री. डिगंबर गणपत चौधरी | १०००=०० |
| २४) | श्री. वामन बाबा पाटील | १०००=०० |
| २५) | श्री. बाजीराव कांगडू पाटील | ५००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| २६) | कै. गंभीर भगवान चौधरी यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. अरुण गंभीर चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| २७) | श्री. डॉ. डी. पी. वारके | १०००=०० |
| २८) | श्री. गोपाल राजाराम चौधरी | १०००=०० |
| २९) | कै. भागवत बाजीराव महाजन यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. किशोर भागवत महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ३०) | कै. ओंकार शिवराम चौधरी (विटवे) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जगन्नथ ओंकार चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| ३१) | कै. काशिराम नाना पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. किशोर काशिराम पाटील (बलवाडी) यांचेकडून | १०००=०० |
| ३२) | कै. बाजीराव नाना पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जगन्नाथ बाजीराव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३३) | कै. लक्ष्मीबाई नारायण पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विनायक नारायण पाटील (बलवाडी) यांचेकडून | १०००=०० |
| ३४) | कै. गयाबाई विठ्ठल पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गोपाल विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३५) | कै. तुकाराम खुशाल पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गोपाल तुकाराम पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३६) | कै. सिताराम केशव महाजन (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रघुनाथ सिताराम महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ३७) | कै. हेमंत बाबुराव अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने यांचेकडून | १०००=०० |
| ३८) | सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | उपप्राचार्य, डॉ. के. जी. कोल्हे यांचेकडून | १०००=०० |
| ३९) | कै. विठ्ठल आनंदा भोळे यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे यांचेकडून | १०००=०० |
| ४०) | कै. सौ. बेबीबाई नामदेव बारी (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. नितीन उत्तमराव बारी यांचेकडून | १०००=०० |
| ४१) | कै. सौ. रुख्मीणीबाई बाबुराव अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने यांचेकडून | १०००=०० |
| ४२) | प्रा. दत्ता पाटील (निंबोल) ह. मु. रावेर | ५०००=०० |
| ४३) | कु. ज्योती गोपाल पाटील (विटवा) | ५००=०० |
| ४४) | कै. बाबुराव बंडू अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. के. बी. अंजने कृषी अधिकारी (पनवेल) यांचेकडून | १०००=०० |
| ४५) | कै. अर्जून दगडू कोल्हे (आसोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | उपप्राचार्य, डॉ. के. जी. कोल्हे यांचेकडून | १०००=०० |
| ४६) | कै. सौ. कविता सतीष पाटील (तांदलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. एस. ए. पाटील यांचेकडून | १००८=०० |
| ४७) | कै. सी. एच. पाटील (निवृत्त आयकर अधिकारी, जळगाव) | |
| | यांचे स्मृती प्रित्यर्थ श्री. ओंकार सी. पाटील यांचेकडून | २०००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| ४८) | कै. विष्णू लक्ष्मण बऱ्हाटे (निंभोरा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. अनिल विष्णू बऱ्हाटे यांचेकडून | ५००=०० |
| ४९) | कै. शकिन तडवी (आडगांव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. जावेद याकुब तडवी यांचेकडून | १०००=०० |
| ५०) | कै. रघुनाथ सोमा काळे (जळगांव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. मनोज अनंत काळे यांचेकडून | २०००=०० |
| ५१) | सहकार मित्र श्री. चंद्रकांत हरी बढे सर (वरणगांव) | २१००=०० |
| ५२) | कै. सौ. राधाबाई रामकृष्ण महाजन (खिरोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. पी. आर. महाजन यांचेकडून | ११११=०० |
| ५३) | श्री. भागवत विश्वनाथ पाटील (निंबोल) | १०००=०० |
| ५४) | कै. नारायण शिवराम महाजन (ऐनपूर) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. वसंत नारायण महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ५५) | कै. ए. एम. पाटील (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे, डॉ. पी. आर. महाजन, प्रा. एस. आर. इंगळे | |
| | डॉ. के. जी. कोल्हे, प्रा. ए. जी. सरोदे यांचेकडून | १००१=०० |
| ५६) | कै. एम. आर. पंजे (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जे. एम. पंजे यांचेकडून | ५००=०० |
| ५७) | कै. विठ्ठल राजाराम पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रविंद्र विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५८) | कै. नारायण गरबड पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विनायक नारायण पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५९) | श्री. डिगंबर लक्ष्मण पाटील (निंभोरा) | १५००=०० |
| ६०) | कै. प्रा. एन. डी. चौधरी (खिरोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. वंदना राणे यांचेकडून | १०००=०० |
| ६१) | गं. भा. नितुबाई भ्र. दयाराम पाटील (रेंभोटा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | डॉ. सिताराम दयाराम पाटील (रेंभोटा) यांचेकडून | ११२१=०० |
| ६२) | कै. हेमंत प्रमोद पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. प्रमोद सिताराम पाटील (रावेर) यांचेकडून | ११५१=०० |
| ६३) | कै. तापीबाई काशीनाथ चौधरी (भोकरी) यांचे स्मृतीप्रित्यर्थ | |
| | श्री. मधुकर काशीनाथ चौधरी यांचेकडून | ३०००=०० |
| ६४) | कै. हरी लक्ष्मण चौधरी (पिंप्रीनांदू) यांचे स्मृतीप्रित्यर्थ | |
| | श्री. मधुकर हरी चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| ६५) | कै. शामू सांडू पाटील यांचे स्मरणार्थ | |
| | श्री. काशीनाथ शामू पाटील (ऐनपूर) यांचेकडून | १५००=०० |
| ६६) | श्री. रामदास शिवराम चौधरी (वाघाडी) | १०००=०० |
| ६७) | कै. नामदेव वना झोपे यांचे स्मरणार्थ | |
| | प्रा. सचिन नामदेव झोपे यांचेकडून | ५००=०० |
| ६८) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कारासाठी | |
| | प्रा. राहूल भिकाजी खंडारे यांचेकडून | १०००=०० |
| ६९) | कै. रमेश लहू हेरोळे यांचे स्मरणार्थ | |
| | प्रा. किसन लहू हेरोळे यांचेकडून | १०००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| ७०) | कै. चंद्राबाई विठ्ठल भोळे यांचे स्मरणार्थ<br>प्रा. डॉ. रमेश विठ्ठल भोळे यांचेकडून | १०००=०० |
| ७१) | कै. सुनंदा व कै. रमेश सिताराम पाटील (भुविकास बैंक, रावेर) यांच्या स्मरणार्थ प्रा.डॉ.व्ही.आर. पाटील उपप्राचार्य श्री.व्ही.एस. नाईक कॉलेज, रावेर यांचेकडून | ११००=०० |
| ७२) | बुद्धवासी कमलाबाई गणपत तायडे रा. निंबोल यांच्या स्मरणार्थ<br>कु. मोहिनी अशोक तायडे यांचेकडून | २०००=०० |
| ७३) | सावित्रीबाई फुले यांच्या स्मरणार्थ (तृतीय वर्ष इतिहास विषयात सर्वप्रथम)<br>कु. नम्रता ज्ञानेश्वर वाघ यांचेकडून | १५००=०० |
| ७४) | रमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ (तृतीय वर्ष विज्ञान वर्गात सर्वप्रथम)<br>कु. नम्रता ज्ञानेश्वर वाघ यांचेकडून | १५००=०० |
| ७५) | कै. बाबुराव उखर्डु महाजन (विटवे) यांचे स्मृतिप्रित्यार्थ<br>श्री. भास्कर बाबुराव महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ७६) | श्री. श्रीराम दयाराम पाटील<br>(संचालक साईराम प्लॅस्टीक ॲन्ड इरिगेशन रावेर) यांचेकडून | ५००=०० |
| | **एकूण रुपये –** | **८६०९२=००** |

# पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना

महाविद्यालयामध्ये विशेष पारितोषिक व शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रा. श्री. भास्करराव आनंदराव पाटील व सौ. निर्मलाबाई भास्करराव पाटील रा. निंबोल ह.मु. पुणे यांचेकडून २,००,०००/- रू. ठेव म्हणून मिळालेले आहेत. त्या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून महाविद्यालयातून पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष निहाय लाभ मिळत आहे.

**शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९**

## १) पारितोषिक योजना :

अ) श्रीमती रंभाबाई आनंदराव पाटील यांच्या स्मरणार्थ सौ. निर्मलाबाई भास्करराव पाटील रा. निंबोल ह. मु. पुणे यांचेकडून **मुलींसाठी** व कै. आनंदराव भगवान पाटील निंबोल यांच्या स्मरणार्थ प्रा.श्री. भास्करराव आनंदराव पाटील रा.निंबोल, ह.मु. पुणे यांचेकडून **मुलांसाठी** पारितोषिक योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेत पात्र विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनींचे नांव | वर्ग | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशाल भास्कर महाजन (मुलांमधून) | तृतीय वर्ष विज्ञान | १०००/- |
| २ | ऋतुजा नरेंद्र पाटील (मुलींमधून) | तृतीय वर्ष विज्ञान | १०००/- |
| ३ | पवन सुनिल गजरे (मुलांमधून) | तृतीय वर्ष कला | १०००/- |
| ४ | दुर्गा अशोक कोळी (मुलींमधून) | तृतीय वर्ष कला | १०००/- |
| ५ | विरेंद्र बाळु कोल्हे (मुलांमधून) | १२ वी विज्ञान | १०००/- |
| ६ | वैष्णवी पंकज पाटील (मुलींमधून) | १२ वी विज्ञान | १०००/- |

## २) शिष्यवृत्ती योजना :

कै. आनंदराव भगवान पाटील रा. निंबोल यांच्या स्मरणार्थ प्रा. श्री. भास्करराव आनंदराव पाटील रा. निंबोल ह. मु. पुणे यांच्या कडून महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस वरील प्रमाणे पारितोषिक वाटप झाल्या नंतर उर्वरित व्याजाची रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येते. शै वर्ष २०१८-१९ मध्ये खालील विद्यार्थी/विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देण्यात आली.

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनींचे नांव | वर्ग | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | महाजन काजल संजय | द्वितीय वर्ष विज्ञान | ३०००/- |
| २ | कचरे शितल ईश्वर | तृतीव वर्ष विज्ञान | ३०००/- |

# हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
# शिष्यवृत्ती २०१८-१९

२०१८–२०१९ या शैक्षणिक वर्षात हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या मार्फत एस.सी., एस.टी. आणि ओ.बी.सी. प्रवर्गातील एकुण ४५ विद्यार्थ्यांना २,६३,००० इतक्या रकमेची शिष्यवृत्ती देण्यात आली. सदर शिष्यवृत्तीचे वितरण एच.पी.सी.एल. च्या पदाधिकारी श्रीमती विनंती केसरकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

हिंदुस्थान पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) शिष्यवृत्तीसाठी बी.ए./बी.एस.सी. प्रथम/द्वितीय व तृतीय हिंदुस्थान वर्ष कला व विज्ञान वर्गातील एकूण ६५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली. या ४५ विद्यार्थ्यांना हिंदुस्थान पेट्रोलियम कोर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) एकूण रु. २,६३,००० रक्कमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले सदर शिष्यवृत्तीचे वाटप एच.पी.सि.एल.चे अधिकारी मा. विनंती केसरकर प्रशासकीय व्यवस्थापक मुंबई व मा. प्रलय जांभूळकर नाशिक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी महाविद्यालयाच्या विविध विद्यार्थी भिमुख उपक्रमाविषयी माहिती दिली. तर मा. विनंती केसरकर यांनी हिंदुस्थान पेट्रोलियम कोर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सि.एल.) विषयी माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीतून मिळालेल्या रकमेतून शैक्षणिक साहित्य खरेदी करुन परीक्षेत यश संपादन करावे. व देशाच्या प्रगतीसाठी सतत जागरुक राहावे. असे प्रतिपादन केले. डॉ.पी.आर.गवळी यांनी हिंदुस्थान पेट्रोलियम कोपोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) चे आभार मानले. सदर कार्यक्रमाला प्रा.एन.यु.बरी, डॉ. पी.आर.महाजन, डॉ. निता वाणी हे उपस्थित होते. सदर शिष्यवृत्तीसाठी समन्वयक प्रा.व्ही.एन.रामटेके,सहसमन्वयक प्रा.पी.आर.गवळी, महेंद्र महाजन यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.व्ही.एन.रामटेके**
समन्वयक

## खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ॥धृ.॥
जगी जे हीन अति पतित । जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे । जगाला प्रेम अर्पावे ॥१॥
सदा जे आर्त अति विकल । जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे । जगाला प्रेम अर्पावे ॥२॥
कुणा ना व्यर्थ शिणवावे । कुणा ना व्यर्थ हिनवावे
समस्ता बुंध मानावे । जगाला प्रेम अर्पावे ॥३॥
प्रभूची लेकरे सारी । तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ॥४॥
असे हे सार धर्माचे । असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे । जगाला प्रेम अर्पावे ॥५॥

---

## बलसागर भारत होवो

बलसाागर भारत होवो । विश्वात शोभुनी राहो ॥धृ॥
हे कंकण करी बांधिये । जनसेवे जीवन दिधले
राष्ट्रार्थ प्राण हे उरले । मी सिध्द मरायाला हो ॥१॥
वैभवी देश चढवीण । सर्वस्व त्यास अर्पिन
तिमीर घोर संहारीन । या बंधु साहाय्याला हो ॥२॥
हातात हात घालून । हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून । या कार्य करायला हो ॥३॥
करि दिव्य पताका घेऊ । प्रिय भारत गीते गाऊ
विश्वात पराक्रम दावू । ही माय निजपदा लाहो ॥४॥
या उठा, या उठा करु हो शर्थ । संपादु दिव्य पुरुषार्थ
हे जीवन ना तरी व्यर्थ । भाग्यसूर्य तळपत राहो ॥५॥

## महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



रंगोत्सव वार्षिक स्नेहसंमेलनात महाविद्यालयीन विद्यार्थी नृत्य सादर करतांना...

महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयात 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने...





महाविद्यालयात आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमाच्या निमित्ताने मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने

ऐनपूर परिसर शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.भागवतभाऊ विश्वनाथ पाटील यांच्या हस्ते उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार स्विकारतांना विद्यार्थीनी कु. महाजन श्वेता पांडूरंग





महाविद्यालयाने मतदान जनजागृती अभियानात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मा.कुलगुरु डॉ. पी.पी. पाटील, तसेच मा.जिल्हाधिकारी श्री. अविनाश ढाकणे, मा.प्रांताधिकारी श्री. अजित थोरबोले यांच्याहस्ते पुरस्कार स्विकारतांना प्रा.एच.एम.बाविस्कर



प्रा.के.आर. देसाई (उका तरसाडी विद्यापीठ बारडोली, गुजरात) हे राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करतांना... व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



राज्यस्तरीय भाषिक अल्पसंख्यांक केळी उत्पादक शेतकरी परिषदेत कृषीभूषण श्री. वसंतराव महाजन ह्यांचे स्वागत करतांना संस्थचे चेअरमन श्री.श्रीराम नारायण पाटील




महाविद्यालयाची प्रशस्त इमारत